मंगळवार, २७ जून २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२८४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 27 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-284 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची गेल्या 51 वर्षांपासून अखंडितपणे विठुरायाच्या भेटीला जाणारी महाराष्ट्रातील एकमेव अशी पालखी आहे. या पालखीला चालक-मालक असे कोणीही नाही. मा. ग्रामपंचायत सदस्य तथा श्रीराम पतसंस्थेचे चेअरमन अविनाश जेऊरकर व ग्रा.पं. सदस्या अनिता जेऊरकर दांम्पत्यांनी पालखीचे जंगी स्वागत करून उभ्या रिंगणाची परंपरा आजही कायम ठेवली. छायाचित्र : सुजित सातपुते

# तुम्ही तुमचे घर सांभाळा

## संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा पाकिस्तानला इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : तुम्ही तुमचे घर सांभाळा. तिथे निर्माण झालेली परिस्थिती पाहाता काहीही घडले तरी आश्चर्य वाटायला नको. पाकव्याप्त काश्मीर परत घेण्यासाठी आम्हाला फार कष्ट करावे लागणार नाहीत. कारण भारतात पुन्हा सहभागी होण्याची मागणी तिथूनच केली जात आहे, असे म्हणत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला इशारा दिला आहे.**



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान भारत आणि अमेरिकेने काढलेल्या संयुक्त निवेदनात पाकिस्तानकडून दहशतवादाला खतपाणी घातले जात असल्याच्या मुद्द्यावर बोट ठेवण्यात आले आहे. या निवेदनात दहशतवादाचा पूर्णपणे निषेध करण्यात आला असून आपला कोणताही भूभाग दहशतवाद्यांना कारवायांसाठी उपलब्ध होणार नाही, याची काळजी घेण्याची तंबी पाकला देण्यात आली आहे. या निवेदनानंतर पाककडून तीव्र प्रतिक्रिया उमटली. पाकच्या प्रवक्त्यांने प्रतिक्रिया देताना पाकिस्तानचा असा उल्लेख करणे अमान्य असल्याचे नमूद केले. भारत आणि अमेरिकेकडून काढण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात पाकिस्तानचा करण्यात आलेला उल्लेख अमान्य, एकांगी आणि गैरसमज पसरवणारा आहे. हा उल्लेख राजनैतिक शिष्टाचाराच्या विरुद्ध असून हेतुपुरस्सर करण्यात आला आहे. अमेरिकेबरोबर पाकिस्तान दहशतवादविरोधी मोहिमेत पूर्ण सहकार्य करत असताना हा उल्लेख निवेदनात समाविष्ट करण्यात आल्याचे आम्हाला आश्चर्य वाटते. पाकव्याप्त काश्मीर ताब्यात ठेवून पाकिस्तानला काहीही फायदा होणार नाही. भारताच्या संसदेनं पाकव्याप्त काश्मीर हा भारताचाच अविभाज्य भाग असल्याबाबत अनेक प्रस्ताव मंजूर केले आहेत. पाकच्या भागातील काश्मीरमध्ये राहणाऱ्या नागरिकांना हे दिसते की सीमेच्या या भागातील नागरिक सुखी-समाधानी आयुष्य जगत आहेत. त्यांच्यावर जेव्हा पाकिस्तान सरकारकडून अत्याचार केले जातात, तेव्हा आम्हाला वेदना होतात, असेही राजनाथ सिंह म्हणाले.

# आ. धंगेकरांकडून आरटीओत झाडाझडती

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे:** मागील काही दिवसांपासून प्रादेशिक परिवहन कार्यालयात कामासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या अडचणी वाढत आहे. याचबरोबर आरटीओच्या ऑनलाइन सुविधा मिळत नसल्याचे प्रकार घडत आहेत. यासह इतर अनेक मुद्द्यांवर कसब्यातील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. आमदार धंगेकर यांच्यासोबत माजी आमदार मोहन जोशी हेही यावेळी उपस्थित होते. धंगेकर यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी डॉ.अजित शिंदे यांची भेट घेतली. या प्रसंगी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर आणि इतर वरिष्ठ अधिकारी हजर होते. आरटीओच्या सेवा मिळवण्यात नागरिकांना येणाऱ्या अडचणींचा पाढा धंगेकर यांनी अधिकाऱ्यांसमोर वाचून दाखवला. त्यात सुधारणा करण्याची मागणी त्यांनी केली. यावर अधिकाऱ्यांनी सुधारणा करण्याचे आश्वासन दिले. शहरात ६ हजार ६०० स्कूल बस आणि व्हॅन आहेत. त्यातील अनेक स्कूल बस आणि व्हॅनकडे आरटीओचे योग्यता प्रमाणपत्र नाही. यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर कोणतीही तडजोड केली जाऊ नये, अशी भूमिका धंगेकर आणि जोशी यांनी घेतली.

# बीआरएस भाजपची ‘बी’ टीम

## नाना पटोले : महाराष्ट्रात परिणाम होणार नाही

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** तेलंगणातील भारत राष्ट्र समिती ही भाजपची बी टीम असून महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांचा काहीही परिणाम होणार नाही. मतविभाजनामुळे कोणाला फायदा होतो हे राज्यातील जनतेला माहित आहे. तेलंगाणात बीआरएस पक्षाला मोठे खिंडार पडले असून त्यांचे अनेक नेते काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत. तेलंगणा पॅटर्न हा गुजरात पॅटर्नसारखाच फसवा आहे. तेलंगणात केसीआर यांच्या पक्षाने काय केले याची सर्व माहिती काँग्रेसकडे आहे लवकर या फसव्या तेलंगणा पॅटर्नची पोलखोल करु, असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

नाना पटोले पुढे म्हणाले की, भारत राष्ट्र समिती महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश करण्याचा प्रयत्न करत आहे पण त्याचा काहीही उपयोग होणार नाही. महाराष्ट्रात काँग्रेस विचाराचेच सरकार यावे ही वारकरी व जनतेची अपेक्षा आहे आणि महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वाखालीच सरकार स्थापन होईल. केसीआर यांनी ९ वर्षात तेलंगणात कोणतेही काम केलेले नाही. कांद्याला तेलंगणात जास्त भाव असल्याचे सांगितले जात होते पण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी तेलंगणात कांदा विक्रीस नेला असता त्यांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. केसीआर सरकार फक्त मोठ-मोठ्या जाहीराती देऊन काम केल्याचा डांगोरा पिटत आहे. जो काम करतो त्याला जाहीरातबाजी करण्याची आवश्यकता भासत नाही. पंढरपूरमध्ये आषाढीवारी होत आहे. या वारीत हैदराबादहून तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर ६०० गाड्यांचा ताफा घेऊन येत असल्याची माहिती समजते. पंढरपुरात आषाढी वारीला १० लाख वारकरी जमतात, त्यात केसीआर यांनी बाहेरुन आणखी लोक आणून गर्दी करायची हे बरोबर आहे का ? पंढरपूरचा विठोबा हा श्रद्धेचा, आस्थेचा विषय आहे, त्याचा कोणी राजकीय फायदा उठवत असेल तर योग्य नाही.

दिवंगत पंतप्रधान इंदिराजी गांधी यांनी कोणत्या परिस्थितीत आणीबाणी लागू केली होती याचा भाजपाने निट अभ्यास करायला पाहिजे. भाजपाला इतिहासच नाही त्यावर ते काय बोलणार ? १९७५ मध्ये अमेरिका-व्हिएतनाम युद्ध सूरू होते आणि त्याच वेळी देशामधील लोकशाही संपुष्टात आणण्यासाठी काही लोकांनी षडयंत्र रचले होते, काही लोक जाणीवपूर्वक चिथावणी देत होते. इंदिराजींनी आणीबाणी लावली नसती तर देशात लोकशाही राहिली नसती. इंदिराजी गांधी यांनी १८ महिन्यानंतर आणीबाणी उठवली व निवडणुकाही घेतल्या. इंदिराजी गांधी लोकशाहीच्या पाईक होत्या म्हणून लोकशाही वाचली. काँग्रेस पक्षाने आणीबाणीबद्दल नंतर माफीही मागितली आहे. पण आता देशात काय चालले आहे ? आणीबाणीपेक्षाही भयानक परिस्थिती आहे. लोकशाही व संविधान धाब्यावर बसवून कारभार सुरु आहे. ९ वर्षापासून देशात अघोषीत आणीबाणी सुरू आहे त्यावर भाजपाने आधी बोलले पाहिजे. मोदी सरकारच्या विरोधात बोलणा-यावर कारवाई केली जाते, सरकारी तपास यंत्रणाचा वारेमाप गैरवापर सुरु आहे, विरोधकांची दडपशाही सुरु असून सरकारविरोधात बोलणाऱ्यांची मुस्कटदाबी केली जात आहे. भाजपाला आणीबाणीवर बोलण्याचा अधिकार नाही, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

कवी म्हणतो ' स्मरल्या मला न तेव्हा माझ्याच गीतपंक्ती, मग ओळ शेवटाची सुचवून रात्र गेली. तसा रात्रीला स्वतःचा रंग नाही. पण प्रकाशाचा अभाव म्हणजे रात्र. अंधाराचा रंग काळा भासतो. आपले अनेक देव राम, कृष्ण, विष्णू, विठ्ठल हे असेच सावळ्या वर्णाचे ! रात्रीचे हे वातावरण त्या सावळ्याच्या रंगात रंगून गेले असे कवीला वाटते. संत एकनाथांच्या समकालीन होऊन गेलेले विष्णुदास नामा यांची एक फार सुंदर रचना आहे. ते म्हणतात रात्र काळी घागर काळी यमुनाजळेही काळे वो माय बुंथ काळी बिलवर काळी गळा मोतिया एकावळी काळी वो माय. रात्रीच्या अंधारात सगळेच कृष्णवर्ण झाले आहे. घागरही काळीच भासते आहे. सर्व चराचराला रात्रीने आपल्या रंगात रंगवून टाकले आहे. दिवसा अगदी स्वच्छ दिसणारे यमुनेचे पाणीही काळेच भासते आहे. ती सखी जी पाणी आणण्यासाठी बाहेर पडते आहे ( खरे म्हणजे रात्रीच्या वेळी यमुनेवरून पाणी आणायला जाणे हे एक निमित्तच असावे. कारण त्या निमित्ताने तो मेघश्याम असलेला कान्हा तिथे भेटेल किंवा आपल्या सोबत येईल ) तिची अंगावरील ओढणी ( बुंथ ) आणि तिने अंगावर परिधान केलेले दागिने सुद्धा काळ्याच रंगाचे झाले आहेत. एवढा रात्रीचा आणि त्या सावळ्या परब्रह्माचा प्रभाव आहे. बंदिनी या चित्रपटातलं एक सुंदर गाणं आहे. मीरेच्या रचनांशी साम्य दाखवणारा अर्थ गीतात भरलेला आहे. ती अभिसारिका आपल्या सावळ्याच्या रंगात एवढी रंगून गेली आहे की आपला गोरा रंगही तिला नकोसा वाटतो. नव्हे तो गोरा रंग तर तिला रात्रीच्या अंधारात नकोसाच वाटतो. कोणी ओळखलं तर... ? म्हणून ती म्हणते मोरा गोरा अंग लै ले, मोहें श्याम रंग दै दे छुपं जाऊंगी रात ही में, मोहे पी का संग दै दे. रात्रीची किती मनोहर रूपे सांगावीत आणि रात्रीबद्दल किती आणि काय लिहावे ? एका वाक्यात सांगायचं तर रात्र म्हणजे मानवाला ईश्वराने दिलेलं वरदान आहे. पण या ईश्वराने दिलेल्या सुंदर वरदानाची मानवाने अक्षरशः ' रात्रीचा दिवस करून ' वाट लावली आहे. रात्रीची शांतता नाहीशी झाली आहे. प्रखर गडद दिव्यांमुळे रात्र जणू रुसून दूर निघून गेली आहे. मानवाला आरोग्य, शांतता प्रदान करणारी रात्र जणू हरवली आहे. रात्र जणू म्हणते आहे, ' हे मानवा, रात्रीचा दिवस तू करू पाहतो आहेस खरा, पण तू तुझ्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतो आहेस एवढे लक्षात ठेव. ' रात्रीचा हा इशारा मानव कधी गंभीरपणे घेईल का ?



## आनंदी पहाट

# बुद्धिजीवी होण्याची गरज परिस्थितीजन्य असते

आधुनिक केसरी

अनेकदा आपल्या गत आयुष्यातील अनेक बाबींची सांगड, बरोबरी, तुलना आपण प्राप्त आणि सद्यःस्थितीशी करत असतो. काहीवेळा नकारात्मक विचार आपल्या अंतर्मनांत थैमान घालायला लागतात आणि भ्रमातले आपण संभ्रमांत जखडून राहतो. चांगलं-वाईट, चूक-बरोबर, खरे-खोटे अशा अनेक समस्या आपल्याला भेडसावत राहतात. अशावेळी, आनंद तर नाहीच पण दुःख आणि निराशा पदरी येते. मग आपण दोष मात्र आपल्या नशिबाला नाहीतर परमेश्वरालाच देत राहतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अनेकदा नकारात्मक विचारच आपले नुकसान करतात. येणाऱ्या अनेक विचारांमध्ये नकारात्मक विचार आपल्याकडून अनावधानाने आपलेसे केले जातात. ह्या नकारात्मक विचारांचा पगडा आपल्या अंतर्मनावर अधिक बसला तर त्याचे परिणाम विपरीत होत असल्याचं अनुभवायला येऊ लागतं. आपल्यापैकी प्रत्येकांत काही उणिवा असतातच, उणिवा नसणारी व्यक्ती सापडणे सद्यःस्थितीत विरळाच; त्याचा शोधही न घेतलेलाच बरा. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यांत काहींमध्ये संकृतीचे तर काहींमध्ये काही विकृतीचे दर्शन आपल्याला घडत असते. अर्थातच कोणत्याही विकृतीची स्वीकृती आपण सहसा करत नाही, पण आपल्या संकृतीला आणि आपापल्या प्रकृतीला साजेशी एखादी कलाकृती ठरेल, अशी कृती करण्याची आपल्याला जाणीव काहीवेळा होत नाही. कालच्या काही उणिवा कुरवाळत बसण्यात आपण धन्यता मानतो, सतत उणिवांचीच, समस्यांचीच, दःखाचीच सर्वत्र आणि सातत्याने चर्चा करत राहतो. आजच्या आपल्या आणि इतरांच्या जाणीवा जपण्याच्या दृष्टीकोनातून आपण खरेच गांभीर्याने विचार करतोच असे नाही. आपल्या बुद्धिवादी जीवाला कालच्या उणिवा दूर करून, आजच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आज खरी गरज आहे.



आधुनिक केसरी

**अल्प माझी मती | झाली दास ||**

मोजावी ती खोली | उथळ पाण्याची ||
काय सागराची | सीमा असे ? ||१||
तैसा हा ज्ञानाचा | सागरू आगळा ||
अमृताचा मळा | ज्ञाना माझा ||२||
गुरूकृपे लाभ | झाला एकांतात ||
तोच लोकांतात | वाटे स्वामी ||३||
सांगितले गुढ | मुळ ब्रह्मज्ञान ||
जाळीले अज्ञान | दुरितांचे ||४||
लोचनात दाटे | करूणा सागर ||
ज्ञानाचे आगर | ज्ञानेश्वरी ||५||
धन्य ही माऊली | काय वर्णू ख्याती ||
अल्प माझी मती | झाली दास ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

जयोऽस्ति ते कृपादेशः सुखं च ते कृपाफलम् | अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ३१ || तुझ्या कृपेचा आदेश म्हणजे जय होय आणि तुझ्या कृपेचे फल म्हणजे सुख होय. म्हणून तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

माया बाहर त्याग है, चाह वासना साथ ।
यह कहु कवन विराग है, फिर ऊठे मन नाथ
।।३२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय)
०४/०६/३२

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

जगाचा बाहेरून त्याग आहे आणि अंतरात विषय-कामना लागून आहे. म्हणून इंद्रियांचा स्वामी मन परत उठेल आणि विषय तरंगात जाऊन आत्म्याला अशांत करेल. सांगा हे कुठले वैराग्य आहे ? अंतरातील मलीन वासनेचा त्याग करूनच कोणी वैराग्य प्राप्त करू शकतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

जीवनात टाळा आटापिटा लवकरात लवकर सद्गुरूचरण गाठा. मानवी जीवनात अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा मानल्या जातात पण त्या शिवाय एक अत्यंत महत्वाची गरज असते ती सद्गुरू चरणांपाशी आश्रयाची. ती आधी प्राप्त झाली की काहीही मिळवायचे रहात नाहीच तसेच या शिवाय जीवनात काही खरे समाधान मिळत नाही हेही तितकेच खरे. जन्मतःच जीव सर्वस्वी असमर्थ/असहाय/परावलंबी असतो. जीवन व्यवहाराचे ज्ञान तो हळूहळू अनेक व्यक्ती व अनुभव यातून गोळा करतो. व आपली विचार सारणी बनवतो. म्हणजेच गुरु करत असतो तद्वतच जीवनात जे आपण करणार ज्या मार्गाने जाणार तो बरोबर की चूक हे ठरवणारे कोण ? कारण आपली वृत्ती मी बरोबर इतरांचे चूक अशीच असते. मग ही वृत्ती गेल्या शिवाय, आपल्या चुका सुधारण्यासाठी व भविष्यात चुका टाळण्यासाठी कोणीतरी पाठीशी असल्या शिवाय आपल्याला आत्मविश्वास येणार नाही. तेव्हा असा खंबीर आत्मविश्वास फक्त गुरूच निर्माण करू शकतात. माणूस हा शरीर + मन + आत्मा असा बनतो. त्यापैकी शरीर व मन याचे कल्याण विज्ञानाने होते त्याने संसार करावा मात्र आत्म्याचे कल्याण होण्यास आत्मज्ञान आवशक असते त्यासाठी अध्यात्मच आवश्यक आहे. तेव्हा याचे मार्गदर्शन फक्त सद्गुरुच करू शकतात. परलोक साधून देणाऱ्याला सद्गुरु म्हणतात. जो मनुष्य आपल्याला कळत नाही हे कबूल करतो, त्यालाच सद्गुरुकडे जाण्याचा रस्ता मोकळा होतो. शिकावे असे ज्याच्या मनात येते तो शिष्य, आणि जो शिकवितो तो गुरू. क्रमशः




विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

# परमार्थ साधणे हाच आपल्या जन्माचा खरा हेतू

आधुनिक केसरी

द्वैतामध्ये दुःख आहे, तर एकामध्ये सुख आणि आनंद आहे. आपण एकामध्ये राहिलो तर आनंद मिळेल. हे जगत् पुष्कळ भासले तरी ते एकच आहे. प्रपंचाच्या दहा दिशा आहेत, पण परमार्थाची मात्र एकच दिशा आहे; तिच्याकडे आपण लक्ष लावावे. काही न करणे, अर्थात् मनाने हा खरा परमार्थ होय. परमार्थामध्ये उपाधी मुळीच नाही; नाही म्हणजे किती नाही, तर ' मी ' सुद्धा तिथे नाही. प्रपंच हा द्वैत आहे, त्याचे अवडंबर मोठे असणारच. आपल्याला आपल्या जगण्याचा अंतिम हेतू जोपर्यंत कळला नाही, तोपर्यंत प्रपंच करणे हेच ध्येय आपण समजतो. वास्तविक, मनुष्यप्राणी हा देह आणि मन दोन्ही मिळून आहे, म्हणून त्याने ऐहिक आणि पारलौकिक दोन्ही गोष्टी साधल्या पाहिजेत. परमार्थ साधणे हाच आपल्या जन्माचा खरा हेतू आहे. व्यवहारात द्वैताशिवाय आनंद नाही. म्हणून परमार्थात, मानसपूजेत, पहिल्याने ' मी ' आणि ' परमात्मा ' अशा द्वैताने सुरुवात करावी लागते.



जोपर्यंत परमार्थ आपल्या हाडीमासी खिळला नाही, तोपर्यंत आपल्याला वाचनाची गरज आहे. त्यापासून साधनाला जोर येतो. मन भगवंताकडे गुंतविण्यासाठी काय करावे हे पहावे. एक बाप आपल्या मुलाला पोहायला शिकवीत होता. बापाने मुलाला पहिल्याप्रथम घोट्याइतक्या पाण्यात आणले, नंतर ढोपराइतक्या पाण्यात आणले, नंतर थोडे आणखी पुढे आणले; आणि एक दिवस त्याने मुलाला पाण्यात खेचून घेतले. त्याप्रमाणे आपले गुरू आपल्याला परमार्थ शिकवीत असतात. आपण पाण्यात उतरले मात्र पाहिजे. देहाने प्रपंच केला पण तो फळाला येत नाही, म्हणून संतांनी नामस्मरणाचा मार्ग सांगितला. पण आमचे शहाणपण, आमचा अभिमान, नाम घेण्याच्या आड येतो त्याला काय करावे ? हा अभिमान दुसरा कुणी उत्पन्न करतो असे थोडेच आहे ? आपल्या ध्यानातही येत नाही. इतके सूक्ष्म असे वासनेचे बीज आपल्यात कुठे तरी दडलेले असते. त्यामुळे लौकिकाची अभिलाषा सुटत नाही. याकरिता संतांनी एक मार्ग सुचविला आहे, आणि तो म्हणजे, नामस्मरणात राहून विषयाची ऊर्मी उठू न देणे. प्रपंचातली विघ्ने ही सूचनावजा असतात; ती आपल्याला जागे करतात. जन्माला आलो तो भगवंताला ओळखण्याकरिता, हे विसरू नये म्हणून विघ्नांची योजना असते. विघ्ने ही आपण भगवंताच्या जवळ जाण्याकरिताच येत असतात. तेव्हा त्यांना न घाबरता, भगवंताच्या नामांतच स्वतःला विसरून जावे, हाच परमार्थाचा सोपा मार्ग आहे.

**आजचे बोधवचन आहे – १६४. जेथे आळस माजला, तेथे परमार्थ बुडाला.**
**श्रीराम समर्थ**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

यः स्वभावो हि यस्यास्ति स नित्यं दुरतिक्रमः ।
वा यदि क्रियते राजा स किं नाश्नात्युपानहम् ॥

सरलार्थ – खरोबर ज्याचा जो स्वभाव असतो, तो कधीच बदलत नाही. कुष्याला जरी राजा केले, तरी तो वहाणा चघळण्याचे सोडील काय ? स्पष्टीकरण : स्वभाव बदलणे मोठे कठीण असते. यासाठी प्रत्येक माणसाचा लक्षात घेऊन त्या अनुरोधानेच त्याच्याकडून काम करून घ्यावे.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



बिफ, राजकारण आणि सामान्य जनता
पान ६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २७ जून २०२३




कुणी, थिएटर देता का रे ? थिएटर ?
पान ८

# शाहू महाराज लोकशाहीचे आधारस्तंभ : पद्माकरराव मुळे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जातीव्यवस्थेविरुद्ध लढा उभारून समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही लोकशाही मूल्य रुजविणाऱ्या छत्रपती शाहू महाराज म्हणजेच यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांची आज १५० वी जयंती. सोमवारी कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त संस्थेचे सचिव पद्माकरराव मुळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव लहाने आणि विश्वस्त समीरभैय्या मुळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले. यावेळी पद्माकरराव मुळे यांनी आपल्या छोटेखानी मनोगतात छत्रपती शाहू महाराज यांच्याविषयीच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. टोकाचा जातीभेद असणाऱ्या काळात १९१८ साली आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा त्यांनी राज्यात लागू केला. छत्रपती शाहू महाराज हे कृतिशील समाजसुधारक होते. समाजातील जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी आणि मागासलेल्या जातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच बहुजनांमध्ये स्वाभिमान निर्माण करण्यासाठी, त्यांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. १९१६ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचा कायदा त्यांनी केला. या कायद्याची अंमलबजावणी नीट होण्यासाठी त्यांनी जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाही अशा पालकांना १ रुपये दंडाची शिक्षा केली. मागासलेल्या जातींना विकासाची समान संधी मिळावी, यासाठी त्यांनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात शासकीय नोकऱ्यांमध्ये मागास जातींसाठी ५० % आरक्षणाची तरतूद केली असे त्यांनी सांगितले.

### CSMSS प्रीमियर लीग बक्षीस वितरण

छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त CSMSS प्रीमियर लीग आंतर महाविद्यालयीन मुले आणि मुलींच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुलींचा अंतिम सामना आयुर्वेद महाविद्यालय आणि दंत महाविद्यालय यांच्यात अतिशय चुरशीचा झाला. यामध्ये आयुर्वेद महाविद्यालयानी बाजी मारली. तर मुलांचा अंतिम सामना आयुर्वेद महाविद्यालय आणि कृषी महाविद्यालय यांच्यात झाला. यामध्ये कृषी महाविद्यालयानी बाजी मारली. यावेळी शर्वरी मुळे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. दत्तात्रय शेळके, डॉ. लता काळे, डॉ. जयश्री देशमुख, डॉ. उल्हास शिंदे, डॉ. गणेश डोंगरे, डॉ. प्रवीण बैनाडे, प्रो. अतुल भोंडवे, डॉ. देवेंद्र भुयार, डॉ. विश्वास कदम, प्रो. चंद्रशेखर राहणे, अशोक आहेर, संजय अंबादास पाटील आणि आयुर्वेद, दंत, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी, कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश मिटकर यांनी केले.








## पंढरपूर यात्रेसाठी ५ हजार विशेष बस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आषाढी एकादशीनिमित्त विठू नामाचा जयघोष करीत पंढरपूरच्या दिशेने रवाना होणाऱ्या वारकऱ्यांसाठी एसटी महामंडळ पुन्हा एकदा सज्ज झाले आहे. दोन वर्षे करोनाच्या संकटानंतर मागील वर्षापासून पंढरपूर येथे आषाढी एकादशीची वारी नियमित सुरू झाली. यंदा या यात्रेसाठी एसटी महामंडळातर्फे सुमारे ५ हजार विशेष बस चालवण्यात येत आहेत.

२५ जून ते ०५ जुलै दरम्यान या विशेष गाड्या धावणार असून वाखरी येथील माऊलींच्या रिंगण सोहळ्यासाठी मंगळवारी २०० अतिरिक्त बस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यात्रेसाठी मुंबईसह पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या सहा प्रदेशातून बसचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रेनिमित्त राज्यातून पंढरपूर येथे जाणाऱ्या वारकरी आणि भक्तांनी या बस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन एसटी महामंडळाकडून करण्यात आले आहे, अशी माहिती एसटी महामंडळाने दिली आहे. औरंगाबाद प्रदेशातून १,२००, मुंबई ५००, नागपूर १००, पुणे १,२००, नाशिक १ हजार आणि अमरावती येथून ७०० अशाप्रकारे यात्रेसाठी विशेष बसचे नियोजन केले आहे. पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये, यासाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत.

## महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूलमध्ये शाहू महाराज जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव येथे महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज दरेगाव येथे राजश्री शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश वेताळ यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. सूत्रसंचालन सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख शिवाजी पडूळे यांनी केले. याप्रसंगी शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव करताना शाहू महाराज यांना राजर्षी ही पदवी त्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कुर्मी समाजाने 21 एप्रिल 1919 रोजी ही पदवी बहाल केली त्यांनी शैक्षणिक उपक्रम राबवताना शिक्षण सक्तीचे व मोफत केले जे पालक मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्यांना एक रुपया दंडाची शक्ती करण्यात आली. महिलांची प्रगती व शिक्षण यासाठी त्यांनी प्रचार व प्रसार केला 1917 मध्ये त्यांनी विधवा विवाह कायदा मंजूर करून त्याची अंमलबजावणी केली. उच्चवर्णीय यांसाठी वेगळ्या शाळा होत्या, त्या वेगळ्या न करता दलित व उच्चवर्णीय यांच्यासाठी एकच शाळा भरवली आंतरजातीय विवाह कायदा मंजूर करून मान्यता दिली. कुस्तीसाठी कोल्हापूर हे कुस्तीचे माहेरघर त्यांच्यामुळेच झाले व कुस्ती शौकीन हे कोल्हापूरला येऊ लागले. असे शाळेचे मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना केले. या कार्यक्रमासाठी शाळेतील कर्मचारी यशवंत पाटील, विश्वास नीळ, विष्णू गायकवाड, मंजुनाथ भवरे, रवींद्र पवार, डॉ. बाळासाहेब निंभोरे, किरण ताकटे, राजू बनसोडे, संतोष शिंदे, संजय देवकर, दत्तू गायकवाड, भरत काळे, रामदास जाधव, श्रीमती रंजनाताई गायकवाड इत्यादी कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शांताराम कापडणे यांनी केले.



## डॉ. मुरहरी केळे पथदर्शी अन् ऊर्जावान व्यक्तिमत्त्व : प्राचार्य ठाले पाटील

### 'प्रकाशयात्री : डॉ. मुरहरी केळे' विशेषांकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** डॉ. मुरहरी केळे हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे. महावितरणमध्ये कर्तव्य पार पाडत असतानाच साहित्य, चित्रपट, अध्यात्म अशा विविध क्षेत्रांत ते उल्लेखनीय कार्य करत आहेत. आज सामाजिक, नैतिक चारित्र्य संपत चाललेले असताना एका अधिकाऱ्याला मानणारा व त्यांच्यावर प्रेम करणारा खूप मोठा कर्मचारीवर्ग आहे. म्हणूनच डॉ.केळे हे कर्मचाऱ्यांसाठी एका दिव्याप्रमाणे पथदर्शी, ऊर्जावान व्यक्तिमत्त्व ठरले आहेत, असे गौरवोद्‌गार मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी काढले. एमजीएम विद्यापीठ परिसरातील आर्यभट्ट सभागृहात शनिवारी (24 जून) ऊर्जा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे अभियंता, साहित्यिक डॉ. मुरहरी केळे यांच्या व्यक्तिमत्त्वावरील डॉ. शिवाजी तिकांडे व दत्ता किवने यांनी संपादित केलेल्या 'प्रकाशयात्री : डॉ. मुरहरी केळे' या विशेषांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी मंचावर एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कवी इंद्रजित भालेराव, ज्येष्ठ पत्रकार दयानंद माने, निवृत्त सनदी अधिकारी, महावितरणचे माजी संचालक डॉ. नरेश गिते, मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपात ठाले पाटील म्हणाले की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये आई-वडिलांनी डॉ.केळे यांना शिकवले. त्यांच्या विशेषांकाच्या प्रकाशनाला आपुलकी, प्रेम वाटणाऱ्या अधिकारी अन् कर्मचाऱ्यांची उपस्थिती हेच दर्शवते की ते खूप कर्मचारीप्रिय आहेत. ते अष्टपैलू, व्यासंगी आहेत. कामाच्या व्याप सांभाळून त्यांनी लेखन केले, त्यांची भाषाही चांगली आहे. आई-वडील यांचे चरित्र आणि स्वतःचे आत्मचरित्र लिहिणारे ते एकमेव लेखक असावेत. आता त्यांनी चरित्रात्मक लेखन करण्याऐवजी कल्पित आणि वास्तव याचा संयोग साधणारे साहित्य रचावे, अशी अपेक्षा ठाले पाटील यांनी व्यक्त केली.

# विरोधकांच्या ऐक्यात खोडा

आधुनिक केसरी

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजय माकन यांनी रविवारी 'आप'वर टीकास्त्र सोडले. 'दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या विरोधी ऐक्याबाबतच्या घोषणा एकजुटीसाठी नाहीत. हा ऐक्य मोडीत काढण्यासाठीचा भारतीय जनता पक्षाबरोबर मिळून केलेला कट आहे, असा आरोप माकन यांनी केला. 'केंद्राने काढलेल्या अध्यादेशाला विरोध करण्यासाठी केजरीवाल काँग्रेसची मदत मागतात. मात्र, अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यासह राजस्थानातील नेत्यांची ते थट्टा करतात, असेही माकन म्हणाले. 'युती करण्यासाठी 'आप' पूर्वअट ठेवते, तर त्यांचे प्रवक्ते विरोधी पक्षांच्या बैठकीच्या दिवशी काँग्रेसचा आणि नेत्यांचा जाहीर अपमान करतात. आधी टीका करायची आणि नंतर पाठिंबा मागायचा, ही कुठली पद्धत आहे,' असा सवालही माकन यांनी ट्विटरद्वारे केला. माकन म्हणाले, केजरीवाल यांचे अलीकडील राजकीय डावपेच गोंधळात टाकणारे आहेत. भाजपला मदत करण्यासाठी आणि काँग्रेसचे नुकसान करण्यासाठी 'आप' भ्रष्टाचाराचा पैसा अनेक राज्यांतील निवडणुका लढवण्यासाठी वापरते. 'आम आदमी पक्षाने पाटणा येथे झालेल्या सभेदरम्यान केलेल्या वक्तव्यामुळे विरोधकांच्या ऐक्यावर फरक पडणार नाही, असे स्पष्टीकरण भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस डी. राजा यांनी दिले. 'सर्व राजकीय पक्ष स्वतंत्र असल्याने त्यांच्यात काही लहान मतभेद असू शकतात. मात्र, ते चर्चेद्वारे नक्कीच दूर केले जाऊ शकतात, असेही त्यांनी सांगितले. विरोधी पक्षांचे नेतृत्व कोण करणार हा आत्ताचा मुद्दाच नाही. मात्र, भाजपला आगामी लोकसभा निवडणुकीच्या निकालाची भीती वाटत असल्याने भाजप असे मुद्दे उपस्थित करीत आहे. एकत्र आलेले धर्मनिरपेक्ष लोकशाही पक्ष कोणत्याही मुद्द्यावर एकत्रितपणे निर्णय घेण्यास सक्षम आहेत. देश आणि राज्यघटनेचे रक्षण करण्यासाठी भाजपला सत्तेवरून हटविणे हेच प्रमुख लक्ष्य असल्याचे सर्व पक्षांनी यापूर्वी सांगितले आहे, असे राजा म्हणाले. केंद्रीय अध्यादेशाच्या मुद्द्यावर कथित उदासीनतेबद्दल आम आदमी पक्षाने काँग्रेसवर आरोप केला. त्यामुळे पाटणा येथे झालेल्या बैठकीतील पाच पक्षांचे नेते 'आप'वर नाराज असल्याचे समजते. 'केंद्राच्या अध्यादेशाचा निषेध करण्यासाठी सर्व पक्षांचे एकमत होते. 'आप'ने हा मुद्दा व्यापक संदर्भात मांडला पाहिजे. काँग्रेसने बैठकीत अध्यादेशाला विरोध करण्यास नकार दिला, असे 'आप'ने अधिकृत निवेदनात म्हटले आहे. हे पूर्णपणे चुकीचे आहे, असे कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस दीपंकर म्हणाले.

# राज्याचे मुख्यमंत्री शिंदेच प्रशासनाच्या दारात ?

आधुनिक केसरी



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

**शासन म्हणजे लोकप्रतिनिधी निर्णय घेत असतात,तर प्रशासन त्याची अंमबजावणी करत असते. या दोघात समन्वय असला तर राज्याच्या विकासाला गती मिळते. महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाची सरकार असो,ते सरकार जनहिताचे निर्णय घेत आलेले आहे. १९६० संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी हे राज्य मराठी भाषिकांचे असेल! असे वचन दिले! ते त्याप्रमाणे ते वागले! सरकारच्या दोन प्रकारच्या योजना असतात! एक सार्वजनिक हिताच्या तर दुसरी वैयक्तीक लाभाच्या योजना असतात! महाराष्ट्रात स्व. वसंतराव नाईक हे दीर्घकाळ म्हणजे ११ वर्षे मुख्यमंत्रीपदावर राहिलेले एकमेव नेते आहेत.**

त्यांनी पंचायत राज, शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले म्हणून त्यांना 'हरितयोध्दा' संबोधले जाते. राज्यातील सुस्त पडलेल्या प्रशासनात शिस्त व कामाला लावण्याचे काम तत्कालिन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण व बॅ. अंतुले यांनी केले. याचा अर्थ इतर मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या भल्यासाठी काहीच केले नाही,असे नाही. महाराष्ट्राच्या विकासात प्रत्येकाचे योगदान आहे. ता महाराष्ट्र राज्याचे विसावे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत. त्यांनी हे सरकार सामान्यांचे असेल! हे अशी घोषणा केली. शिंदे हे पक्षाचा सामान्य कार्यकर्ता, मंत्री, त्यानंतर मुख्यमंत्री झाले असल्याने त्यांना सामान्य माणसाचे प्रश्नांची जाणीव आहे. कोणी किती म्हणो! मुख्यमंत्री शिंदे धडाधड निर्णय घेत आहेत! ते कार्यालयात, घरी प्रवासात बसून फाईलवर सह्या करत असतात! मुख्यमंत्र्याकडे 'फाईल पेंडीग' असे आता तरी ऐकावयाला मिळत नाही. गेल्या अकरा महिन्यात या सरकारने १८ हजार कोटीच्या २९ सुधारित प्रशासकीय कामांना मान्यता दिली तर राज्यात संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना १० हजार कोटीची मदत केली आहे! म्हणजे शिंदे सरकार पाऊल चांगले पडत आहेत! यात रविवार दि. २५ जून मुख्यमंत्री शिंदे यांनी रोजी पावसामुळे मुंबई शहरात ज्या भागात पाणी साचले, तेथे सकाळी जाऊन पाहणी केली. दुपारी ते नांदेडला आले! सांयकाळी पंढपूर येथील आषाढी एकादशीनिमित्ताने तेथे व्यवस्थेची पहाणी केली. शिंदे यांचा दौरा रद्द होता, अशी चर्चा नांदेड प्रशासकीय अधिकाऱ्यात चर्चा सुरू झाली होती. पण ते घाईत का होईना नांदेड दोन तासाकरिता येवून गेले. शिंदे यांच्या कामातून लोककामांची कळमळ व तळमळ निश्चितच पहावयाला मिळते! यामुळे विरोधकांना मळमळही होते! हे राजकारणामुळे! काही नेत्यांना विकासाचा ठेका आपलाच आहे, तो इतराना नाही अश्या अर्विभावात राजकारण आले आहेत. मुख्यमंत्री शिंदे नांदेडला विकास कामाच्या शुभारंभाच्यानिमित्ताने आले असता तेथे विरोध त्यासाठी अशकून कशासाठी! यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यानी 'नारळ फोडो' आंदोलन केले! काँग्रेसची सत्ता असताना मोठे उद्योग शिलान्यास झाला होता, मग त्याचे उद्योगाचे काय झाले ? सत्ता नसतानाही विरोधी पक्षाच्या नेत्यांला मुख्यमंत्र्याची भेट घेवून प्रश्न मांडता येतात. सत्ताधारी सरकारला आपल्या मतदार संघात विकासाची कामे करण्यास भाग पाडणे, तो खरा विरोधी पक्ष नेता! कारण जनतेने त्यासाठी निवडून दिले आहे ना! निवडणुकीच्यावेळी सत्ताधारी व विरोधी पक्षांनी एकमेकांशी बिलकुल दोन हात करावेत, कोण नको म्हणतोय! मुख्यमंत्री शिंदे यांचा नांदेड दौरा शासकीय व राजकीय होता ? कारण मुख्यमंत्र्याचे भाषण केले राजकीय स्वरूपात होते! लोकसभेचे २०२४ मध्ये निवडणुक होणार आहे, त्याआधी नांदेड महापालिकेची निवडणूक होणार आहे! त्यामुळे मृग नक्षत्रात राजकीय मतांची पेरणी केली जात असावी. फडणवीस मुख्यमंत्री असताना नांदेडला केवळ ठराविकांच्या भेटी व फोटो काढून जात असत, त्यांनी नांदेडच्या विकासाचा एकही दगड बसविला नाही. त्यामुळे २०१७ च्या नांदेड मनपाच्या निवडणुकीत भाजपाचा दारुण पराभव झाला. त्यावेळी 'आशोक पर्व आले'अशी प्रतिक्रिया उमटली होती. नांदेड जिल्हा चव्हाणाचा बाल्लेकिल्ला असे म्हंटले जातेय! वास्तविक नांदेडचाखासदार भाजपा आहे. विधानसभेच्या नऊ जागांपैकी काँग्रेसचे चार तर त्यात भाजपाचे तीन तर शिवसेना केवळ एक,शे,का. पक्ष एक आमदार आहेत! जिल्हा परिषद,पंचायत समिती काँग्रेसच्या ताब्यात आहेत. आता मतदार चणाक्ष झालेला आहे! पूर्वीप्रमाणे गाव, जिल्हा तालुका, लोकसभा,



विधानसभा मतदार संघ कोणाच्या मालकीचे राहिलेले नाहीत. शिंदे यांनी भाषणात 'सरकारी काम सहा महिने थांब' या म्हणीचा उल्लेख केला. पण राज्यातील सामान्य माणसाचा शासनावरचा विश्वास उडत चालला आहे. कारण पैश्याशिवाय कोणतेही कामे होत नाहीत.पुणे येथे वरिष्ठ दर्जा अधिकारी लाच घेताना पकडला जातो,त्याच्याकडे कोट्यवधीचे घबाड सापडले. मुंबईत माजी सनदी प्रशासकीय अधिकाऱ्याकडे कोट्यवधी संपत्ती आढळते. विकास कामाच्या नावावर लोकप्रतिनिधीचे कमीशन ठरलेले आहे. कारण त्या कामाचे कंत्राटदार तेच ठरवित असतात, मग आमदार, जि.प. सदस्य, नगरसेवक हे सर्व सेवाभावाने केवळ 'माया'भाव म्हणून करत आहेत. मग तक्रार कोणाकडे करावयाची! यात भ्रष्टाचारात लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी ' भ्रष्टाचार मैत्री झालेली आहे! केंद्रीय बांधकाम मंत्री गडकरी यांनी रस्ते कामात लोकप्रतिनिधीच कंत्राटदाराला पैसे मागत असल्याची, अशी गंभीर तक्रार केली होती, त्याचे काय झाले ? राज्यात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना भीती राहिलेली नाही. शिंदे यांनी नांदेडच्या ५६७ कोटी कल्याणकारी योजनाचा शुभारंभ पावसाळ्यात केला. या कामातून कोणाचे 'कल्याण' होणार आहे, हे लोकांना कळतय ? ही कामे कोणती ? ही कामे दर्जादार होतात की नाही ? यावर नजर ठेवणे हे जागृत मतदारांनी जबाबदारीआहे. नाही तर, पाच वर्षे रडत बसावे लागेल! तसेच विरोधी पक्षाने भ्रष्टाचाराबाबत रान उठविले पाहिजे! पण दुर्देवाने तसे पहावयाला मिळत नाहीत! यात सत्ताधारी व विरोधी पक्ष नेत्यांनी एकमेकाच्या कामातील भ्रष्टाचाराबाबत तक्रारी करावयाच्या नाहीत, असा अलिखित राजकीय समझौता झालेला असतो. 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री नांदेडला येवून गेले. म्हणजे मुख्यमंत्रीच प्रशासनाच्या दारात आले. गेले वर्षभरात जिल्हा प्रशासन लाभार्थ्यांच्या घरापर्यंत गेले का ? हे कोण विचारणार ? राज्य शासनाच्या सुमारे २५० तर केंद्र शासनाच्या तेवढ्याच योजना आहेत. त्या सामान्य माणसापर्यंत पोहचत का ? याचा विचार केला जात नाही. मुख्यमंत्री आले तरच लाभार्थ्यांना योजनेचालाभ मिळणार काय ? आज राज्यातील प्रत्येक तहसील व जिल्हा कार्यालयात गरीब माणूस खेटे मारताना पहावयाला मिळेल. तो तालुका तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रारी करतो, निवेदन देतो. अशा स्वरुपाचे तालुका, जिल्हा पातळीवर महिन्याला दहा हजार अर्ज तर मंत्रालयात रोज एक लाखांनी निवेदन येत असतात, असा अंदाज आहे. त्याचे काय होते ? राज्यातील प्रशासन सामान्य माणसाच्या पत्राची दखल घेते काय ? केवळ अति महत्वाच्या महत्वाच्या व्यक्तींची मात्र नोंद घेते! प्रशासन सामान्यांच्या पत्राला साधे उत्तर देत नाही. या पत्रांना केराची टोपली दाखविली जाते!मग शासन सामान्य माणसासाठी आहे, असे म्हणावयाचे काय ? राज्यात काँग्रेसची सत्ता असताना तक्रार दिन, लोकशाही दिनाला महत्व दिले जात होते. आता हे दिन कालबाह्य झाले आहेत. गरिब कुटुंबाला योजनेसाठी कागदपत्रे जमा करताना नाकेनऊ येते! खर तर योजना किचकट व सुटसुटीत असाव्यात.त्यात योजनेचा अर्ज भरताना कुटुंबाला तीनशे ते चारशे रूपयांची दक्षिणा मोजावी लागते! यात काही तलाठ्यांना तर गरीबांचा छळ करण्यात आनंद वाटतो! नांदेडात तर सुविधा केंद्र लूट केंद्र बनले आहे. केंद्रावर योजनेचा अर्ज भरविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने दर निश्चित केले आहेत. पण त्याबाबतचे दर फलक केंद्रावर लावले गेलेच नाहीत. नांदेड जिल्हा प्रशासनाने 'शासन आपल्या दारी' माध्यमातून ८१ शासकीय योजनांच्या ४० हजार लाभार्थ्यांना एकत्र आणले, असे सांगितले. हे आज कळाले! प्रशासन यावरुन मुख्यमंत्र्यांची दिशाभूल करत असावे, असे वाटते! जिल्हा प्रशासनाने स्वतः हून लाभार्थ्यांचा घरी जाऊन शोध घेतला, जिल्हा प्रशासनाकडे किती योजनेचा लाभ मिळत नसल्याच्या किती तक्रारी आल्या व त्याची बोळवण कशी गेली ? याचे उत्तर द्यावे. हळदा येथील शेतकरी वामन भालेराव नांदेड उत्तर मतदार संघात राहतात! त्यांची दोन कर्ती मुले मेली आहेत. हे गरीब शेतकरी फडणवीस, ठाकरे, शिंदे व जिल्हा प्रशासनाकडे २०१७ पासून सतत मदतीची मागणी करत आहेत. याला न्याय मिळाला काय ? मग राज्य व प्रशासन काय करतेय ? त्यांच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही, हे दुर्देव नाही काय ? हे केवळ उदाहरण दिले आहे, असे असंख्य कुटुंब शासकीय योजनेपासून वंचित आहेत. केवळ शासन गतिमान असून चालत नाहीत, प्रशासनाची अमंलबजावणी गतिमान असले पाहिजे. ते जर राज्यात होत असेल, तर महाराष्ट्रात पुन्हा शिंदे- फडणवीस जोडीचे सरकार सत्तेपासून येण्यास कोणीही रोखू शकणार नाही, असे वाटते.

# यशाचं रहस्य काय ?

आधुनिक केसरी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

**' पुढच्याच ठेच, मागचा शहाणा' अशी एक म्हण आहे. म्हणजे पुढच्या माणसाने ज्या चुका केल्या, त्या चुका आपल्या हातून होणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे. यशाचे खरे हेच गमक आहे. यश मिळवण्यासाठी उगीच घाई करून चालत नाही. शिवाय एकापेक्षा अधिक कामांत हात घालून चालत नाही. कारण त्यामुळे कुठल्या एकाच कामाकडे पूर्ण लक्ष देता येत नाही. एका वेळी एकापेक्षा अधिक कामे करणारी व्यक्ती कोणत्याही कामात यश मिळवू शकत नाही. दोन नावांमध्ये बसून प्रवास करणाऱ्यांप्रमाणेच बुडणे हेच त्याच्या नशिबी असते. 'एक ना धड भाराभर चिंध्या' असे उगीच म्हटलेले नाही. म्हणजे अपयशाची अनेक कारणे आहेत, ही यशस्वी होणाऱ्या माणसाने अयशस्वी लोकांकडून शिकले पाहिजे.**

त्यामुळे अपयशी माणसेही वाचायला शिकली पाहिजेत, हे प्रामुख्याने लक्षात ठेवले पाहिजे. यश मिळवण्यासाठी विनाकारण घाई करून चालत नाही. कारण यशासाठी केलेली घाई, हीसुद्धा अपयशी होण्याचे कारण आहे. आणि ही चूक आपण लगेच सुधारली पाहिजे. जर त्यातून आपण काही शिकू शकलो नाहीत तर मात्र शेवटी पदरी आपल्या धोकाच आहे. निराशाच आहे. प्रेरक विचार देणारे सूर्यासिन्हा म्हणतात,यशस्वी लोक चुका करून त्यांचा स्वीकार करतात आणि त्यात सुधारणा करून पुढे जातात. हुशार लोक आपल्या आणि दुसऱ्याच्या अपयशातून धडा घेतात आणि आपले सर्व लक्ष यशावर लक्ष केंद्रित करतात. एकदा पराभवाने खचलेली व्यक्ती जीवनात यशस्वी झालेल्या एका व्यक्तीकडे गेली. त्याने यशस्वी व्यक्तीला विचारले, "दादा, तुमच्या यशाचे रहस्य काय आहे ? " यशस्वी व्यक्ती त्याला म्हणाली, आयुष्यात जी माणसं यशस्वी झाली नाहीत, त्यांच्याकडूनच तर मी जीवनात यशस्वी होण्याचे धडे घेतले आहेत. अपयशी व्यक्ती म्हणाली, तुम्ही काय सांगता आहात, ते मला काही कळालं नाही, जरा समजून सांगितलं तर बरं होईल. तेव्हा यशस्वी व्यक्ती म्हणाली, मला सांगा, तुमच्या पदरात अपयश का पडल ? अपयशी माणूस म्हणाला, " पूर्वी मी खूप श्रीमंत होतो. यशस्वी होण्यासाठी मी एक कंपनी काढली. त्यात मी खूप मोठी गुंतवणूक केली. मला लगेच यशस्वी व्हायचं होतं. त्यामुळे मी त्याचवर्षी पुन्हा एक दुसरी कंपनी सुरू केली. त्यात मी माझे उरलेले सगळे पैसे गुंतवले. मी घाईगडबडीने दोन कंपन्या सुरू केल्या,पण मला कोणत्याही कंपनीला पूर्ण वेळ देता आला नाही. तो पुढे सांगू लागला काही वर्षातच दोन्ही कंपन्या तोट्यात गेल्या. मला त्या कंपन्या वर काढण्याकरता पैसाच मिळाला नाही.



मग काय! दिवसेंदिवस तोटा वाढत चालला आणि शेवटी एक दिवस कंपन्या बंद कराव्या लागल्या. आज मी पूर्ण अपयशी आहे. आता यशस्वी व्यक्ती म्हणाली, तुमच्या अपयशाची दोन कारणे आहेत.एक म्हणजे,तुम्ही एकाच वेळी दोन कंपन्या सुरू केल्या. त्यामुळे तुम्ही कुठल्याही एका कंपनीला पूर्ण वेळ देऊ शकला नाही. दुसरे कारण म्हणजे,तुम्ही या दोन्ही कंपन्यांमध्ये तुमचा सगळा पैसा गुंतवला. ज्यावेळेला तुम्हाला कंपन्यांमध्ये तोटा झाला,त्यावेळेला त्या कंपन्या तोट्यातून बाहेर काढण्यासाठी तुमच्याजवळ पैसाच शिल्लक नव्हता. आता मी जे सांगितले, हे बरोबर आहे का ? तुम्ही याच्याशी सहमत आहात का ? मग आता मला सांगा,या अपयशातून तुम्ही काय शिकला ? अपयशी व्यक्ती म्हणाली, मी माझ्या अपयशातून काय शिकणार ? यशस्वी झालो असतो तर बरंच काही शिकलो असतो. यशस्वी व्यक्ती म्हणाली, तुम्ही तुमच्या अपयशातून काहीच शिकला नाहीत. म्हणून तुम्ही आजदेखील अपयशी आहात.मी मात्र अपयशी लोकांच्या अपयशातूनच शिकलो आणि यशस्वी झालो. मी अपयशी लोकांनी ज्या चुका केल्या, त्या चुकांमधून शिकलो आणि माझ्या आयुष्यात त्या चुका केल्या नाहीत. हेच माझ्या यशाचे रहस्य आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शहरप्रमुखाचा ठाकरे गटाला जय महाराष्ट्र

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** येथील शिवसेनेचे ठाकरे गटाचे शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक सुनील पवार यांचा ठाकरे गटाला जय महाराष्ट्र हा जय महाराष्ट्र केल्यामुळे शहरातील शिवसेनेला चांगलंच भगदाड पडलेची चांगलेच चर्चेला उधाण आले आहे पवार यांनी भाजपा मध्ये जाण्याचा निर्णयाने शिवसेनेमध्ये कुठेतरी उचंबना होताना दिसून येत आहे तसेच विद्यमान आमदार ही कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करत असल्याची जोरदार चर्चा ही सुरू आहे. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवतजी कराड यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाउपाध्यक्ष संजय खंबायते जिल्हा परीषद सदस्य किशोर पवार, तालुका अध्यक्ष भगवान कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.

# कारागृह अधीक्षकपदी अरुणा मुगुटराव

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षकपदी अरुणा मुगूटराव यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी मावळते अधीक्षक प्रमोद वाघ यांच्याकडून सूत्रे स्वीकारली.
कारागृहाचे उपअधीक्षक सचिन चिकणे, वरिष्ठ कारागृह अधिकारी अशोक मलवाड, देविका बेडवाल, वैभव अत्राम, असद मोमीन आदींनी कर्मचाऱ्यांतर्फे मुगूटराव यांचा सत्कार केला. पारदर्शी कारभार आणि प्रशासकीय शिस्तीला प्राधान्य दिले जाईल, असे मुगूटराव यांनी म्हटले आहे. कारागृहातील आठ कारखान्यांव्दारे महसूलात वाढ व कारागृह शेतीचा विकास, कर्मचारी आणि बंद्यासाठी कल्याणकारी योजना यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# सुधीरभाऊंनी मोदीजींचे कार्य नेमक्या शब्दात मांडले : उपमुख्यमंत्री फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** देशगौरव,पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे कार्य अद्भुत आहे. असे नेतृत्व भारताला लाभणे हे आपले भाग्य आहे . अश्या महान नेत्यांचे कार्य राज्याचे वनमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी नेमक्या शब्दांमध्ये 'आर्किटेक्ट ऑफ न्यू इंडिया' या पुस्तकाच्या माध्यमातून घराघरात पोहोचविण्याचे जे व्रत हाती घेतले आहे ते स्तुत्य आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूर येथे केले. वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार लिखित 'आर्किटेक्ट ऑफ न्यू इंडिया' या पुस्तकाच्या मराठी आवृत्तीच्या प्रकाशन मोदी@9 महाजनसंपर्क अभियानाअंतर्गत आयोजित कार्यक्रमात सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.
यावेळी व्यासपीठावर वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, आमदार कीर्तीकुमार भांगडिया, आमदार संजीव रेड्डी बोदकुलवार, आमदार संदीप धुर्वे, माजी मंत्री डॉ. परिणय फुके, माजी आमदार डॉ. आशिष देशमुख, अतुल देशकर,संजय धोटे, सुदर्शन निमकर, भाजपा नेते चंदनसिंह चंदेल, प्रमोद कडु, राजेंद्र गांधी, हरीश शर्मा, संध्या गुरनुले, राखी कंचर्लावार आदी उपस्थित होते. हजारो कार्यकर्त्यांच्या सोबत ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे आणि रमेश राजुरकर यांनी आज वेगवेगळ्या कार्यक्रमात भाजपात प्रवेश केला. त्यांचेही मान्यवरांच्या उपस्थितीत स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना ना. श्री. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, जगातील अनेक देश देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि भारतापुढे झुकत आहेत. आयुष्यमान भारत योजना जगातील सर्वोत्तम मानली जात आहे. एम्सची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. शासकीय रुग्णालय व महाविद्यालयांची संख्याही भक्कम झाली आहे असे मुनगंटीवार म्हणाले. मुद्रा योजना, स्टॅन्डअप योजना, स्टार्टअप योजना आदी अनेक योजना देशगौरव, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी यशस्वी करून दाखविल्या. ज्या काश्मिरात आधी बॉम्बगोळे फेकले जात होते. त्याच काश्मिरातील लाल चौकात आता तिरंगा शानदारपणे फडकत आहे. देशाच्या विकासासाठी विश्वगौरव, देशगौरव, जननायक पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या पाठिशी जनता ठामपणे उभे राहणे गरजेचे आहे, असे नमूद करीत ना. श्री. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, कॉँग्रेसने देशावर आणीबाणी लादली. या आणीबाणीच्या काळात देशाला खिळखिळे करण्याचे काम कॉँग्रेसने केले आहे.
आता देशाला भयमुक्त करण्याचे काम पंतप्रधान नरेद्रजी मोदी यांनी केल्याचेही ते म्हणाले. भारतात लोकशाही समृद्ध होत असल्याचे नमूद करीत मुनगंटीवार म्हणाले की भारतीय लोकशाहीच्या आयुधांचा वापर करीत विश्वगौरव, देशगौरव, जननायक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्याचे बळ माता महाकाली व भगवान अंचलेश्वर सर्वांना प्रदान करो. कॉँग्रेस आणि समविचारी पक्ष देशात विषारी विचार पेरण्याचे काम करीत आहेत. त्यांच्या या विचारांच्या भूलथापांना बळी न पडता प्रत्येकाने राष्ट्रविकासासाठी देशगौरव नरेंद्रजी मोदी यांच्या पाठिशी उभे रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.
याप्रसंगी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनीही उपस्थिताना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी केले तर सूत्रसंचालन भाजपा महानगरचे जिल्हाध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे केले आभारप्रदर्शन भाजपा महामंत्री महानगर रवींद्र गुरुनुले यांनी केले.





# जखमी नाग, मुंगुस, सापाला दिले जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** मानवी वस्तीत पाण्याच्या शोधात आलेल्या मुंगुस, नाग आणि तस्कर जातीच्या सापाला जेजुरीचे ज्येष्ठ सर्प मित्र आयुब खान यांनी जीवदान दिले. सध्या जयाद्री डोंगर दऱ्यातील पाणीसाठा संपल्यामुळे अनेक वन्यजीव प्राण्यांनी पाण्याकरिता मनुष्य वस्तीकडे धाव घेतली. कोरड्या पाण्याच्या टाकीत पडलेल्या मुंगसाच्या तोंडाला जखम झाल्याने ते लोखंडी तारांमध्ये अडकलेले आढळून आले. भर रस्त्यावरून नागाच्या अंगावरून गाडी गेल्याने तो जखमी अवस्थेत रस्त्यात आढळला होता. तर तस्कर साप एका घरात जखमी दिसून आल्याने आयुब खान यांनी या सर्वांना वन्यजीव संरक्षण केंद्र असलेल्या कवडेवाडी पिंगोरी येथील इला फॉउंडेशन केंद्रात उपचार करून त्यांची निसर्गात मुक्तता केली. यावेळी वन्यजीवप्रेमी मेजर प्रशांत काकडे, पायलट कुलदीप ढगे, अनिकेत भालेराव यांच्या सहकार्याने जयाद्री निसर्गात या वन्यजीवांना मुक्त करण्यात आले. आयुब खान सत्तरहून अधिक वर्षाचे असून त्यांनी आपले जीवन वन्यजीव रक्षणात व्यतीत केले आहे.




महाराष्ट्र Business Katta












# बीफ, राजकारण आणि सामान्य जनता



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सध्या महाराष्ट्रा मध्ये अनेक घटना अशा घडत आहेत की बिफ च्या संशयावरून मारहार व हत्या करण्यात आली. गोरक्षकाला मारहाण करण्यात आली. वगैरे वगैरे. मुळात प्रश्न हा आहे की बिफ विसयी लोकांना एवढे धार्मिक आणि भावनिक का बनवले गेले? भारत बिफ निर्यात करणारा जगातील सर्वात मोठा देश आहे. बिफ निर्यातीमुळे भारताला करोडो रुपयांचा नफा झालेला आहे. गेल्या नऊ वर्षात बिफ निर्यात असून वाढली आहे. बिफ निर्यातीमध्ये भारत जगातील एक नंबरचे राष्ट्र असेल असे स्वतः प्रधानमंत्री स्वतः जाहीर करतात. नुकतेच भारत सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने गाय व म्हैस निर्यात विधेयक आणले आहे. गाय व म्हैस निर्यात करून चांगल्या प्रकारे परकीय चलन मिळवता येते. ही वस्तुस्थिती आहे.**

दुसरी सर्वात मोठी बाब म्हणजे बिफ आणि मुस्लिम यांना एकाच रांगेमध्ये उभे करून बिफ संदर्भात सरळ सरळ मुस्लिमांना दोष दिला जातो. परंतु बिफ हे खाद्य आहे आणि हे खाणाऱ्याला जात धर्म नसतो. बिफ खाणे किंवा न खाणे याचा कोणत्याहीही धर्माशी संबध नाही. याच धर्मातील लोक बिफ खातात असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. कोणी काय खावं व खाऊ नये हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. उद्धव ठाकरे यांनी अनेक वेळा बोलुनही दाखवले महाराष्ट्रात गायीला माता म्हणणारे गोव्यात जाऊन खातात. याचाच अर्थ स्वतः ला हिंदुत्ववादी समजणारे सुद्धां बिफ खातात. माजी न्यायधिश काटजू असे म्हणतात मी बिफ खातो आणि मी गाईला माता नाही तर केवळ प्राणी मानतो. अनेक सेलिब्रिटी, नामांकित खेळाडू हे सुद्धां बिफ खातात अनेक वेळा बिफ विषयी मते सुद्धां प्रकाशित होतात. म्हणून बिफ संदर्भात केवळ मुसलमानांना टार्गेट करून मारहाण किंवा हत्या करणे चुकिचेच आहे. विषय हा आहे की लोक बिफ संदर्भात एवढे भावनिक होऊन टोकाचे निर्णय का घेतात तर त्याचे मुळ कारण आहे बिफ व गाई विषयी केलेले धार्मिक राजकारण. राजकीय नेते जनतेचे काम करायला अपयशी ठरतात व जनतेचा पैसा स्वतः लाटतात. स्वतः चे घर भरताना जनकल्याण नेत्यांना दिसतच नाही. लोकांसाठी कोणतेही काम जसे शिक्षण, रोजगार आरोग्य महागाई यावर काम न करता केवळ लोकांना धर्माच्या नावाखाली भावनिक बनवायचे, धर्माच्या नावाखाली लोकांच्या डोक्यात चुकिच्या व तथ्थहीन भावना भरून द्यायच्या आणि राजकारण करायचे. धर्माशी भावनिक झालेले लोक स्वतः च्या मेंदुचा कोणताही वापर न करता नेत्याने किती ही चुकिचे व भ्रमक सांगितले तरी त्याला सत्य माणुन कृती करणारे लोक निर्माण झाले. जेव्हा लोक स्वतः च्या समस्येसाठी नाही नेत्यांनी भडकवून दिल्यानंतर पेटून उठतात तेव्हा त्यात राजकीय हित असते ह्या गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे. राजकीय नेत्यांनी हिंदुत्वाच्या नावाखाली गाईला माता बनवून लोकांना भावनिक बनवले. सहाजिकच आहे जर एकिकडे घाईला धार्मिक माता म्हणायचे आणि आपल्या धर्मातील मातेला दुसऱ्या धर्मातील लोक मारून खात असतील, विकत असतील तर वाईट वाटणारच आहे. परंतु राजकारण बाजूला ठेवून आपण विचार करावा. जे लोक गोमाता आहे आणि त्याचे संरक्षण झाले पाहिजे असे म्हणतात त्यांच्या घरी किती गाई आहेत ? त्यांच्या मुलांनी किती लोकांना गाई विकण्यापासुन वा कापण्या पासून वाचवले ? नेत्यांनी किंवा त्यांच्या मुलांनी किती लोकांच्या हत्या बिफ च्या संदर्भात केल्या ? याचे उत्तर शोधले तर सत्य समोर येईल व राजकीय षडयंत्र बाहेर येईल. जो गाय कधीच पाळत नाही, ज्याचे मुल किंवा स्वतः कधिच गोमूत्र पित नाही ते गाय आणि गोमुत्राला पवित्र आहे असे सांगतात. गाय हा पशु आहे तो उपयुक्त आहे. परंतु गायीला धर्माशी जोडून इतर धर्मीय लोकांना मारावे हे तरी धर्माला मान्य आहे का ? एकिकडे गायीला माता मानायचे आणि बैलाला पिता मानण्यास नकार द्यायचा यात काही तथ्य आहे का ? सत्य परिस्थिती बघितली तर सर्वसामान्य लोकांच्या कृतीची किव येते. कारण गाईला माता माणुन सन्मान करता मान्य आहे. आईचा सन्मान व्हायलाच पाहीजे. मग दररोज एक तरी बातमी येते मुलाने किंवा मुलीचे आईची हत्या केली, हजारो आश्रमात लाखों वृद्ध असे आहेत कि ज्यांचे मुल मुली करोडो रुपये कमवतात. मग गाईला माता माणुन गाईचे सरंक्षण करतो म्हणणारे वृद्धाश्रमातुन त्यांच्या मुला मुलींच्या बंगल्यात नेण्यासाठी कधीच कोणी बोलत नाही. जन्मदाते वृद्धाश्रमात सोडायला आलेल्या मुलांना आडवणयाची घटना कधीच घडत नाही. राजकारणी लोकांनी अनेक काल्पनिक व तथ्यहीन गोष्टींविषयी लोकांना भावनिक बनवले व त्यांचा वापर राजकीय उद्देशासाठी होतो. मुळात ज्यांचा वापर राजकारणासाठी होतो त्यांना कोणताही फायदा मिळत नाही. या मध्ये मरण होते सर्व सामान्य लोकांचे. राजकीय नेते व गाईला माता म्हणून भडकवणारे सुखा समाधानात राहतात अडचणी सर्व सामान्य लोकांना होतात. आणि तेव्हा मात्र कोणीच



सोबतीला नसते. आताचे नाशिक चे उदाहरण घेतले तर बिफचा संशय आहे म्हणून एकाची हत्या करण्यात आली. अकरा लोकांना पोलीसांनी ताब्यात घेतले. हा विषयी एवढ्यावरच थांबत नाही. अशा घटना या अगोदर ही खुप घडल्या आणि या पुढेही घडणार परंतु अशा घटना थांबवायच्या असल्यास वैचारिक विचार करणे आवश्यक आहे. एका जनाची हत्या झाली म्हणजे त्याचे कुटुंब उद्ध्वस्त झाले. गाईच्या संरक्षणासाठी अकरा लोकांनी हा गुन्हा केला म्हणजे अकरा लोकांना आता कोर्ट कचेरी व इतर बाबींना समोरे जावे लागते. अकरा लोकांनी पोलिसांनी पकडले तर अकरा लोकांच्या घरी असलेल्या आईचा विचार कोणी केला असेल का ? गाईसाठी आरोपी झालेला मुलगा पाहून घरातील आईला सुख, समाधान मिळणार आहे का ? गाईसाठी हत्या करणाऱ्याच्या जमानती व इतर खर्च गाय माता आहे, धर्म धोक्यात आहे म्हणणारे नेते करणार का ? गाईसाठी हत्या करून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहताना धर्मातील लोक सन्मान व समर्थन करतील का ? एका गाई साठी बारा घरातील आई दुःखी कष्टी झाल्या त्यांचे दुःख कमी करण्यासाठी कोणाकडे काही उपाय आहेत का ? मुळीच नाही. जन्मदात्या आईला दुःखात टाकुन पशुतील आईला वाचवण्यासाठी आपण आरोपी बनत असु, आणि धर्म व गाईच्या नावावर राजकारण करणारे लोक अशा अडचणीत सोडवायला येत नसतील तर लक्षात घ्या तुमचा वापर संपला आहे. आता राजकीय लोकांना तुमची गरज राहली नाही म्हणून ते चुकुनही तुमच्या कडे येणार नाहीत. म्हणून वास्तविक जिवन जगताना बिफला जाती धर्माशी न जोडता ते खाद्यन्न आहे ज्याला खायचे त्याला खाऊ द्यावे ज्याला नाही खायचे त्याला जबरदस्ती करू नये. दुसरी गोष्ट गायीला धर्माशी जोडून राजकीय लोकांच्या चक्रव्यूहात स्वतः फसु नये. हिंदू धर्मात इतरही प्राण्यांना महत्त्व आहे परंतु त्या विषयी एवढे भावनिक नाही कारण इतर प्राण्याचे राजकारण केले जात नाही. उंदीर गणपतीचे वाहन आहे तरीही गणपतीला माणणारे घरातील उंदीराची पुजा तर करत नाहीत. घरात उंदीर झाले तर नासाडी करतात म्हणुन उंदीर पकडून बाहेर सोडून देणे, औषधी टाकुन मारून टाकण्याचे प्रकार स्वतः हिंदू लोक करतात. मग त्या ठिकाणी गणपयीचे वाहन असलेल्या उंदीराला मारणाराही तेवढाच दोषी पाहिजे जेवढा गाईला मारणारा असतो. गाय बैल कापून खाल्ले जातात. खाण्याला, अन्नाला पवित्र माणले जाते. परंतु उंदीर मारुन बाहेर फेकून दिले जाते मग जास्त घातक काय ? कोणत्याही निरर्थक बाबींचा संदर्भ धर्माशी जोडू नये. आणि धर्माच्या नावावर केल्या जाणाऱ्या राजकारणात सर्वसामान्य लोकांनी फसू नये. शेवटी जेव्हा अडचण किंवा दुःख येते तेव्हा पाठीशी खंबीरपणे उभा कोणतीही नेता किंवा धर्माचा रक्षक येत नाही तेव्हा स्वतः चे आई वडील स्वतः च्या लेकरा साठी खंभीर पणे उभे राहतात. परंतु त्यांना खंबीर पणे उभे राहतात किती हताश व्हावे लागते, कीती यातना होतात हे तेव्हा च कळते जेव्हा मुलगा आरोपी होतो. म्हणून आईवडिलांचा सन्मान वाढेल व त्यांना दुःख होणार नाही यावर लक्ष द्यायला पाहिजे. राजकीय नेत्यांना गाय काय आहे माहिती आहे म्हणून ते गाईवर राजकारण करतात, अनेक लोक बाहेर जाऊन खातात आणि विकुन पैसाही करतात सर्व सामान्य मानसाला मात्र धर्म संकटात टाकतात. गाय माता आहे गाय पवित्र आहे असे राजकीय लोक सांगत असतील तर त्यांना अगोदर गाईचे संरक्षण कसे करायचे हे स्वतः करून दाखवण्याचा आग्रह करून सर्वसामान्य नागरिकांनी जागृत होने आवश्यक आहे.

# कृषी क्षेत्रातील रोजगार संधी



डॉ. दत्तात्रय शेळके
संपर्क क्र. ९९ २१ ५५१ ०९९

आधुनिक केसरी

**भारतामध्ये आजही शेतीला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण 70% जनतेची उपजिविका ही शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून आहे. अलिकडेच जागतिकीकरणामुळे शेती हा व्यवसाय करणे प्राप्त झाले आहे. अशा परिस्थितीत शेतीची आधुनिक तंत्रज्ञान अवगत करणे आवश्यक ठरते. आधुनिक तंत्रज्ञानामध्ये जैवतंत्रज्ञान, हरितगृह, ठिबक व तुषार सिंचन, पड व भाजीपाला प्रक्रिया यांत्रिकी शेती बाबींचा अंतर्भाव होतो, हे आधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी शिक्षित मनुष्यबळाची गरज असते. ही गरज लक्षात घेउनच केंद्र तथा राज्य शासनाने प्रत्येक राज्यात कृषि महाविद्यालये जिल्हा तसेच तालुका पातळीवर सुरु करून शेतक-यांच्या मुलांना व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे.**

शेती हा मागील काही वर्षात तोट्याचा उद्योग झाल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढून त्याचा विपरीत परिणाम शेती क्षेत्रावर होताना दिसत आहे. यासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण व बळ देवुन उभे करावे लागेल. शेतमाल विक्रीपश्चात प्रक्रिया, बाजार व्यवस्था व त्यासंलग्न अनेक घटक आहेत ज्यात अनेक उद्योगांची संधी आहेत. या संधीपैकी काही महत्वाच्या संधी खालील प्रमाणे आहेत

**1. दर्जेदार कृषि उत्पादने**

शेतीमाल प्रक्रिया उद्योगाला प्रक्रियेसाठी उत्तम प्रतिचा शेतमाल लागतो. गुड ॲग्रीकल्चरल प्रैक्टिस या आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार शेतीमाल उत्पादन करणे आणि त्यातून स्थानिक व निर्यात बाजारपेठ यांच्याशी जोडणे या मूल्य साखळीतील सर्वात पहिल्या घटकात ग्रामीण युवकांना गटशेती उद्योगातून चांगली संधी निर्माण होऊ शकते. दर्जेदार उत्पादन करण्यासाठी पिकांचे व्यवस्थापन करणे गरजेचे असते. या व्यवस्थापनादरम्यान निविष्ठा (शेतीसाठी लागणारी खते, औषधे, बियाणे वगैरे), सिंचन, पिकांची मशागत, अनद्रव्य व्यवस्थापन, किडरोग व्यवस्थापन, कृषि अवजारे केंद्र अशा प्रकाराच्या संलग्न व्यवसायामध्ये अनेक सेवा संधी दडलेल्या आहेत.



**2. कृषियंत्र उद्योग**

शेतीकामासाठी मजुरांची उपलब्धता कमी होत असल्यामुळे शेती आता यांत्रिकीकरणावर अवलंबून आहे. बाजारामध्ये अनेक प्रकारची यंत्रे उपलब्ध आहेत. भाडेतत्वावर यंत्रपुरवठा हा एक चांगला व्यवसाय म्हणून गेल्या काही काळात पुढे आला आहे. ट्रॅक्टर संचलित अवजारे व यंत्रे यांची बैंक तयार करून शेतक-यांच्या गरजेनुसार त्यांना भाडेतत्वावर पुरवठा करणे, हा व्यवसाय अनेक युवकांना चांगल्या प्रकारचे उत्पादन मिळवून देवू शकतो. यामध्ये शेतीची मशागत, पेरणी, आंतरमशागत, खतपेरणी, पिकसंरक्षण तसेच पिक काढणी अशा प्रकारच्या कामासाठी यंत्राचा उपयोग होवू शकतो.

**3. काढणी पश्चात उद्योग**

शेतीमाल उत्पादन झाल्यानंतर बाजारात जाण्यापुर्वी प्राथमिक प्रक्रिया करून जर शेतीमाल बाजारात गेला तर त्याला साधारणतः 20 ते 25 % जास्त भाव मिळू शकतो. यासाठी ग्रामीण भागात युवकांसाठी प्राथमिक प्रक्रिया करण्याची काही यंत्रे विकत घेवून शेतमालाची स्वच्छता, प्रतवारी आणि पॅकिंग करून शेतमाल बाजारात पाठविणे अशा प्रकारच्या सेवा देण्यासाठी चांगला उद्योग उभा राहू शकतो.

**4. शेतकरी उत्पादन कंपनी**

भारत सरकारच्या येजनेतून शेतकरी उत्पादन कंपन्यांचे जाळे देशभर उभे केले जात आहे. ग्रामीण भागात



उत्पादक शेतक-यांनी त्यांचा माल सामूदायिकरित्या एकचीत करून शेतकरी उत्पादन कंपनीच्या माध्यमातून प्रक्रिया केल्यामुळे तसेच बाजारपेठ सोडुन इतरत्र विक्री केल्यामुळे शेतमालाला वाजवी मोबदला मिळण्यास मदत होते. महाराष्ट्रामध्ये अनेक शेतकरी उत्पादन कंपन्या कार्यरत व पंजीकृत झाल्या आहेत, देशपातळीवर दहा हजार शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचे उधिष्ट आहे. त्यामध्ये ग्रामीण युवक व शेतक-यांनी एकत्रित येवून कंपनी रजिस्टर केली, तर ती कंपनी कशी चालवायची याबाबत मार्गदर्शन व फायदा कमविण्यासाठी लागणारे प्रशिक्षण त्यांना मिळाल्यास शेतकरी उत्पादक कंपन्यांचा माध्यमातून ग्रामीण भागामध्ये खूप चांगला व्यवसाय उभा राहू शकतो.



**5. शेती क्षेत्राशी संलग्न व्यवसाय**

शेती क्षेत्राशी संलग्न असे अनेक व्यवसाय आहेत. ट्रॅक्टर व अवजारे देखभाल दुरुस्ती, कृषि अवजारांची सेवाकेंद्र, हवामान अंदाज व शेती सल्ला केंद्र अशा प्रकारचे सेवा उद्योग युवक स्वतंत्रपणे किंवा समविचारी गट तयार करून चांगल्या प्रकारे करू शकतात.

**6. वाहतूक व व्यवसाय**



शेतीमाल, फळे व भाज्या काढणीनंतर बाजारापर्यंत पोहोचविणे यासाठी वाहतूक व्यवसाय करण्याची संधी अनेक युवकांना मिळू शकते. नाशवंत फळे व भाज्या योग्य प्रकारे शेतावरती स्वच्छ करून, प्रतवारी करून, चांगल्या प्रकारचे पॅकेजिंग करून व वाहनामध्ये योग्य रितीने लोडिंग करून बाजारापर्यंत सुरक्षितपणे पाठविण्यासाठी कौशल्य असणा-या युवकांना यामधून रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

**7. शेतीमाल प्रक्रिया उद्योग**

उत्पादनानंतर लहान लहान प्रक्रिया उद्योग करण्यासाठी ग्रामीण युवकांना फार मोठया संधी आहेत. शहरी भागामध्ये काम करणा-या सर्व क्षेत्रातील लोकांची कार्यशक्ती वाढली असून त्यांच्याकडे वेळही कमी असतो. या लोकांचा प्रक्रियायुक्त रेडी टू कूक व रेडी टू इट अशा प्रकारच्या अवाकडे कल वाढला आहे. ग्रामीण भागामध्ये ज्याठिकाणी तो माल उत्पादित होतो, त्याचठिकाणी अशा प्रकारच्या अन्नप्रक्रिया उद्योगाचे जाळे निर्माण झाल्यास तेच अन्न चांगल्या प्रकारचे पॅकिंग करून ब्रेडिंग करून बाजारात स्वस्त दरामध्ये ग्राहकांना मिळू शकेल. हे करण्यासाठी ग्रामीण लोकांना याविषयाचे तंत्रज्ञान व्यवस्थपन व आर्थिक नियोजन या विषयी प्रशिक्षित करून बँकिंग क्षेत्राच्या मदतीने लघु किंवा मध्यम उद्योग उभारण्याची संधी मोठया प्रमाणात उपलब्ध आहे.

**8. ट्रेडिंग व मार्केटिंग**

शेतीमालाचा व्यापार व विक्री यामध्ये अनेक संधी दडलेल्या आहेत. उदा. उत्पादक शेतकऱ्यांकडून शेतमाल विकत घेवून त्याची चांगल्या प्रकारे स्वच्छता, प्रतवारी, पॅकिंग व ग्रेडिंग करून 1 ते 5 किलोच्या पॅकमध्ये घरपोच मिळेल अशा प्रकारच्या उद्योगाला फार मोठा वाद येत्या काळात आहे. उसे प्रयोग अनेक सुशिक्षित युवकांना ॲप तयार करून ऑनलाईन विक्रीच्या माध्यमातून सुरु केलेले दिसतात. अशाच प्रकारचा उद्योग करण्याची संधी आणि यासाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे.

**9. स्टार्टअप**

अलीकडे शेतीव्यवसायाच्या मुल्यसाखळीमध्ये संधी शोधून नवीन तंत्रज्ञान शोधून अनेक स्टार्टअप कंपन्यांची स्थापना भारतातील शेती क्षेत्रात होत आहे. या क्षेत्रामध्ये सेवा पुरवणे, ट्रेडिंग करणे, विक्री व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था, तंत्रज्ञान निर्मिती. शेतीतील कार्यक्षमता वाढवणे, नवीन तंत्रज्ञानावर आधारित सेंसरचा वापर करून शेतीकामाची सिंचनाची तसेच शेतीतील इतर सर्व घडामोडीच्या संदर्भाने स्टार्टअप सुरु झाले आहे. या स्टार्टपांना केंद्र सरकार तसेच खासगी फडिंग एजन्सीच्या मार्फत चालना दिली जाते. मागील काही वर्षात शेती क्षेत्रामध्ये अशा प्रकारच्या नवीन कंपन्या उभ्या करण्यात तरुणांचा कल वाढत असून यामध्ये अनेक रोजगाराच्या संधी दडलेल्या आहेत.

**(लेखक हे छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित कृषि महाविद्यालय, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे संचालक आहेत.)**

# कुणी, थिएटर देता का रे ? थिएटर ?



सागर ननावरे, पुणे
प्रख्यात स्तंभलेखक

आधुनिक केसरी

**एक चित्रपट भिंती वाचून, पडद्या वाचून, रसिकप्रेक्षकांच्या माये वाचून, डिस्ट्रिब्युटरच्या दये वाचून, विनंत्या करीत हिंडत आहे. जिथुन शो काढणार नाही, अशी टाकीज ढूंढत आहे, कुणी, थिएटर देता का रे ? थिएटर ? अशीच अवस्था झाली आहे एका उत्तम मराठी कलाकृतीची. २०१५ साली ख्वाडा या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या सिनेमाचे दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांच्या TDM या चित्रपटाला शो मिळत नसल्याची बातमी मध्यंतरी झळकली. २८ एप्रिल रोजी 'टीडीएम' हा बहुचर्चित मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. मात्र केदार शिंदे यांच्या 'महाराष्ट्र शाहीर' या चित्रपटाचा फटका त्याला बसला आणि स्क्रीन नसल्याने हा चित्रपट लवकरच चित्रपटगृहातून उतरवण्यात आला. चित्रपटाच्या संपूर्ण टीमसाठी हा मोठा धक्का होता.**

चित्रपटाला एकवेळ प्रेक्षकांनी नाकारणे आपण समजू शकतो. परंतु प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद असतानाही शो मिळत नसल्याने चित्रपट गुंडाळावा लागणे हे नक्कीच वेदनादायी ठरते. आणि अशीच काहीशी अवस्था कऱ्हाडे यांच्या TDM या चित्रपटाची झाल्याची पाहायला मिळाली. मात्र एवढ्यावर मराठी माणूस कसला. भाऊरावांनी तो पुन्हा एकदा ९ जून रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आणला. यावेळी कदाचित त्यांना सांगायचे असेल की,

***या कलाकाराला मान नको,***
***खोटा नाटा सन्मान नको,***
***वरवरचे कौतुक नको ...अन***
***मराठी कलेचा अपमान नको,***
***हवा किमान दररोज एक शो.***
***कलाकृतीला बहरण्यासाठी ,***
***नव्या प्रयत्नांच्या भाऊ'गर्दीत..***
***नवे सितारे उमलण्यासाठी,***
***एक हक्काचं व्यासपीठ हवंय ..***
***शिट्ट्या टाळ्यांच्या गजरात ..***
***निखळ आनंदी मनोरंजनासाठी..... .***

***कुणी, थिएटर देता का रे ? थिएटर ?***

९ जूनला हा चित्रपट प्रदर्शित झाला खरा पण अपेक्षेप्रमाणे शो या सिनेमाला मिळाले नाहीत. आणि त्यानंतर आलेल्या आदिपुरुषने 'टीडीएम' चे थिएटरमधील उरलेसुरले अस्तित्वही संपुष्टात आणले. मात्र एवढे असतानाही महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आजही याचे विशेष शो आयोजित केले जात आहेत हीच काय ती दिलासादायक बाब.

टीडीएम व्यतिरिक्त 'तेंडल्या', 'बलोच' यासारख्या उत्तम सिनेमांनादेखील हिंदी चित्रपटांमुळे फटका बसला. मराठी चित्रपट बॉलिवूड,टॉलिवूड प्रमाणे चांगला बनत नाही असे मराठी माणूस सहजपणे बोलून जातो.परंतु गेल्या अनेक वर्षांपासून मराठी सिनेसृष्टीत अनेक उत्तम सिनेमे बनले आहेत आणि बनतही आहेत. मात्र यात प्रेक्षक आणि चित्रपट गृह मालक यांनी कुठेतरी मराठी चित्रपटांना उचलून धरायला हवे. मराठी प्रेक्षकांनी ठरवलं तर मराठी चित्रपट एका वेगळ्या उंचीवर निश्चितच जाईल. हिंदी चित्रपटांची मक्तेदारी मोडली जाऊन साऊथप्रमाणे प्रादेशिक सिनेमे विविध भाषेतून देशभरात प्रदर्शित होतील. याचबरोबर कुठेतरी लोकाश्रयाचा फायदाही मराठी सिनेमांना व्हायला हवा. अनेक दर्जेदार मराठी चित्रपटांची जी गळचेपी होतेय ती थांबण्यासाठी राजकीय महत्वाकांक्षाही वाढायला हवी.




१९७१ साली दादा कोंडकेंचा 'सोंगाड्या' चित्रिकरण होऊन पूर्ण झाला. दादांनी निर्मिती केलेला हा पहिला सिनेमा. 'सोंगाड्या' प्रदर्शनासाठी तयार झाला, मात्र त्याला मुंबईत थिएटरच मिळेना. त्या काळात मुंबईतल्या 'कोहिनूर' थिएटरमध्ये एका हिंदी सिनेमामुळे दादांचा सोंगाड्या उतरवावा लागला. दादांनी खूप प्रयत्न केले. राजकीय दिगज्जांची दारे ठोठावली परंतु काहीही फायदा झाला नाही. शेवटी ते बाळासाहेब ठाकरेंकडे गेले. बाळासाहेबांनी दादांचा अभिनय पाहिलेला होता. त्यानंतर बाळासाहेबांनी अशी काही सूत्रे फिरवली की सोंगाड्या पुन्हा कोहिनुरला लागला. आणि विशेष म्हणजे त्यानंतर 'कोहिनूर'मध्ये 'सोंगाड्या' तब्बल ३७ आठवडे हाऊसफुल्ल चालला. बाळासाहेबांनी जणू छत्रपती शाहू महाराजांचा कलेला राजाश्रय देण्याचा वैचारिक वारसा पुढे चालविला. सध्याची मराठी सिनेमांवर अनेकदा उद्भवणारी अशी परिस्थिती पाहता मराठी चित्रपटांना उचलून धरण्याची आवश्यकता आहे. तसेच जेवढी जबाबदारी रसिक प्रेक्षकांची आहे तितकीच जबाबदारी सिने निर्माते दिग्दर्शक यांची सुद्धा आहे. इंडस्ट्रीतील इतर कलाकारांची सुद्धा आहे. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मराठी चित्रपटांना फटका बसण्याचं कारण म्हणजे इतर मराठी भंपक चित्रपट. केवळ निर्माता दिग्दर्शक म्हणून मिरवण्याची हौस असणारे आणि अनुदानाच्या आशेवर असणारे आशयहीन चित्रपट रसिकांची निराशा करतात. आणि यामुळे पुढे दमदार कथानक आणि सादरीकरण असणाऱ्या चित्रपटाकडेही लोक पाठ फिरवतात. अशी एक ना अनेक आव्हाने सध्या मराठी सिनेसृष्टीपुढे आहेत. आता गरज आहे ती ही आव्हाने लिलया पेलण्याची. प्रत्येक मराठीजनाने मराठी सिनेसृष्टीच्या कल्याणासाठी एकवटण्याची.

# आजची महिला



राजश्री कुलकर्णी
संपर्क क्र. 98271 42714

आधुनिक केसरी

**महिलांबद्दल आज प्रत्येक माध्यमातून भरभरून लिहून येते, महिला ही देवीचे रूप आहे, ती जगत्जननी आहे, नारी शक्तीत प्रचंड ताकद असते, प्रत्येक यशा मागे स्त्रीचा हात असतो, जागतीक महिला दिन साजरा केला जातो, एक दिवस महिलांच भरभरून गुणगान केलं जातं पण मग सध्या काय चाललय, आज स्त्रीची शक्ति कुठे हरवली आहे, का तिची सारखी कुचंबना होते, का रोज रोज तिच्या वर अत्याचार होतोय, का आज महिला असुरक्षित आहे. कधी यावर आपण विचार केलाच नाही ना आणि केला ही असेल तर यावर आपण समाधान शोधून आणायचे कसे, का स्त्री ही फक्त एक जागतीक दिन पूरतीच सबळ महिला आहे, जगत्जननी आहे का ?**

बघा ना एक स्त्री जी नौकरी करते, घर सांभाळते, ऑफिसमधे जी स्त्री खूप मोठ्या पदावर असते घरी येऊन तिची किंमत काय असते ? हे आपण बघतोच की, प्रत्येक घरात बघीतले तर नवीन कहाणी काही घरात तर इतका मान मिळतो की कळत नाही आणि काही घरात फक्त अपमान, अरे करतो काय आपण जिला जगत्जननी म्हणतो तिलाच मारहाण शिव्या-शाप का ? जर याचा विचार केला तर खूप गंभीर विषय आहे हा. कुठली स्त्री असेल जिला वाटत असेल की माझ घर तूटावे किंवा मी नव-या पासून मुलां पासून लांब रहाव. आज बघा प्रत्येक चांगल्या गोष्टीसाठी आपण आभार व्यक्त तर करतो फक्त तात्पुरता किंवा नावापुरता का स्त्रीच्या जातीचा त्याग का कोणाला दिसत नाही का ? बघा ना जन्म घेतल्या क्षणी तीचा सर्वात जवळचा माणूस असतो वडील तिचा सुपरहीरो, तो जसा शिकवतो ती शिकते, भाऊ बहीण राहीले अजून त्याना पण जीव लावते आणि आईची सावली बनून मिरवते, भांडते, प्रेम करते, दिल्या हक्काने वागते. मग का तिला आपण जगायची मोकळीक देत नाही ? आता जगायची मोकळीक म्हणजे तर तिला पण तिचे आवड-निवड जपायची संधी द्यावी, तिच्या पण इच्छेचा मान द्यावा तिला वेळो वेळी विचारा, तिचा आनंद जपा. स्त्री या जातीला काहीही अपेक्षा नसते तेवढ प्रेम सोडलं तर तिला प्रत्येक वेळी इतकच वाटते की मला पण जर संधी मिळाली असती तर मला पण अस काही करता आला असत. मग बघा काय राहते फक्त संधी हा दोन अक्षरी शब्द एका स्त्रीच सगळचं आयुष्य बदलून देईल. पुर्वी बायका नौकरी करत नसत पण आज नोकरी करणा-या बायकांचे प्रमाण वाढलं आहे त्या बरोबर बाकीच्या जवाबदा-या पण वाढल्या पण हे समजते कोण, लोकाना वाटतं अरे काय करते ही फक्त जॉब करते, हो जॉब करते मी बरोबर घर ही साभाळते. उत्तर घर बाहेर दोन्ही मिळून मी दोन जॉब करते घरातील प्रत्येक सदस्याच्या आवडी निवडी जपते घरातली छोटी मोठी जबाबदारी पार पाडते, सणवार करते, घरात आलेल्यांचे हसून स्वागत करते, किती ही आजारी असले तरी ही चेह-यावर हसू असते कधी मन भरून आलं तर फक्त उशी भिजत असते पण कोणाला कळूही देत नाही, घरातील सगळे मी बघते पण घर कोणाचे तर नव-याचे, सास-याचे आणि मुलाचे का कारण मला स्त्री म्हणून कधीच सुट्टी नसते मुळात मी स्त्री म्हणून हा फक्त आणि फक्त माझच काम आहे, कमवते पण माझ्या पगारावर पण माझा कुठे अधिकार, म्हणता याची मुलगी त्याची बहीण त्याची बायको त्याची आई अरे स्त्री म्हणून माझा स्वतःचा का एक नाव नाही का मला बाकीचे लोकांचे नावाची ओळख. मी स्वतः निमात्री




आहे आणि बघायला गेले तर माझे काय तर काहीच नाही. सुरक्षित कुठे आहे मी किंवा माझी भावना अरे कोण विचार करतोय माझा, म्हणे रेप होतात. कारण मुली छोटे कपडे घालतात, घरोघरी काही ना काही हेच. अस झाले तर स्त्रीच जबाबदार आणि तस झाला तरीही तिच, मग चांगले कामाचे क्रेडीट का तिला नाही. सुरक्षित तर जाउ द्या स्वातंत्र्य पण नाही अस नका करू तस नका करू अशी वाग तशी वाग अरे पण का फक्त मिच ? या समाजामधले लोक असा का विचार करत नाहीत की माझा पण अधिकार आहे जगण्याचा, हसण्याचा, आनंद घेण्याचा, शिकण्याचा, मला का फक्त सगळ नावापुरत. आज आपण जे बघतो किंवा ऐकतो तर कोणी विचार केलाय का की असे होतेय तर चला थोडा आपण विचार करूया की मुळात ह्याची सुरुवात करुन आणि कशी. घरात अपमान मारहाण किंवा डुंडा ना देण्या मुळे कित्येक मुली त्रास सहन करतात का कारण वडील आणि भावानं लग्न करून दिलय त्यांच नाव नको खराब व्हायला. किंवा मुलं आहे त्यांना काय वाटणार लोकाना काय वाटणार किंवा ते काय म्हणतील म्हणून सगळं सहन करायच आणि बस घरापासून जी सवय लागली तर बाहेर पण तीच सहन करण्याची सवय पण कधी कोणी विचार केलाय का भितीनी फक्त तिला आजू बाजू असणारे प्रत्येकाची प्रतिक्रियेची भीती कश्यामूळे कारण माझ जर काही सांगितल तर लोक त्या दुसऱ्या व्यक्तीची चूक ना बघता माझीच चूक काढतील याची भीती. आणि हीच भीती पुढे जाऊन जीव घेते स्त्रीचा. आपण आज जे काही बघतो किंवा जे काही घडते याचा कधीच विचार केला नसेल लोकांच्या चुकावर प्रतिक्रिया देण खूप सोप्प पण कधीही आपण त्याचा खोलवर जाऊन विचार केला ? गरज आहे बदलाची समाजामध्ये राहणारे प्रत्येकाच्या विचारा मध्ये बदल हे घडणार आणि आपण आपल्या स्वतःपासून ही सुरूवात करायची. त्रास सहन नाही करायचं जिथे चूक आहे लोकांची ते बरोबर कळविण्याची, आपलं मत व्यक्त करण्याची, चूकीला बिनधास्त चूक म्हणून बोलण्याची आपण स्वतः आपली सुरक्षा करायची कारण स्त्री जर सीताचं रूप आहे ना तर ती आदिशक्ति माँ दुर्गा यांचे पण रूप आहे. मग हे फक्त बघायचं की तिला केंव्हा कुठे कुठलं रूप घ्यायच स्त्री बिचारी नाही . एक खूप छान वाक्य आहे dont let someone Come in between you & your happiness. मग हा प्रत्येक स्त्रीला आपल्या जीवनात आणायला पाहीजे. जिथे तिथे सहन का करायचं आणि कशासाठी फक्त नाव ठेऊन घेण्यासाठी ?. स्त्रीच का सहन करणार पुरुषांच पण कर्तव्य असते मुलांना शिकवावं, चांगले संस्कार द्यावेत मग आरोप फक्त स्त्रीवरच का ? सहन कराव, पण स्वतःच्या आत्मसन्मान सोडून नाही, त्याग करायचं पण किती आणि कुठे हेच विचार करून आणि हो स्त्री आहे म्हणून सहन फक्त मीच का करायचा. हे बदलण्याची गरज आहे, आज कायदा महिलांच्या बाजूने आहे पण याची किती अंमलबजावणी होतेय हा एक प्रश्नच आहे, स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा, घरच्यांचा दृष्टीकोण बदलला पाहिजे, प्रत्येक घरात महिलांचा मान-सन्मान झाला तरच प्रगती आहे नाही तर जग विनाशाकडे गेल्या शिवाय रहाणार नाही.

# संत तुकाराम महाराजांचे अभंग

आधुनिक केसरी

संत तुकाराम महाराज यांच्या समता एकात्मता शांतता बंधुता निधर्मी वा धर्मनिरपेक्ष विचार धारा मुळे सर्व धर्म जाती जमाती मधील वैष्णव जन त्यांच्या वारकरी मोहीमेचे पाईक झाले होते . याशिवाय सुफी संत परंपरेतील काही निवडक संत तुकाराम महाराजांच्या समकालीन होते . मुसलमान वारकरीही होते . ते हिंदी उर्दू मराठी मिश्रीत भाषेचा वापर करत होते . अशा भक्तांना त्यांना समजेल अशा भाषेत काही उपदेश करण्यासाठी संत तुकाराम महाराजांनी थोडेसे हिंदी भाषेला जवळचे अभंग रचलेले आहेत. सर्व संत तुकाराम महाराज गाथा मध्ये हे आजही उपलब्ध आहेत . वारकरी संप्रदाय हा सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर कष्टकरी श्रमकरी वर्गातील रंजले गांजलेले बहुजन हिंदू व असेच धर्मांतरित मुस्लिम व तत्सम अन्य समाज यांनी आपल्या मानसिक समाधानासाठी तसेच सामाजिक सांस्कृतिक ऐक्यासाठी निर्माण केलेली चळवळ आहे . तर विठ्ठल भक्ती व चिंतन यातूनच सर्वांगीण विकास व्हावा यासाठी एक होणे ही संकल्पना आहे . सध्याच्या वारीत काही मुसलमान व हिंदू वारकऱ्यांनी गाईलेला मूळ अभंग असा आहे .... ( अभंग क्रमांक ३९३७ पान ८७७ . संपादक - दिवाकर अनंत घैसास . जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज जनसेवा प्रतिष्ठान, पुणे . )



अल्ला देवे अल्ला दिलावे ।अल्ला दारु अल्ला खिलावे ।अल्ला बिगर नहीं कोय ।अल्ला करे सोहि होय ।।१।। मर्द होय वो खड़ा फीर ।नामर्दकुं नही धीर । अपने दिलकूं करना खुसी। तीन दामकी क्या खुमासी ।। २ ।। सब रसोंका किया मार ।

भजनगोली एक ही सार ।इमान तो सबही सखा ।

थोडी तोभी लेकर ज्या ।।३।। जिन्हो पास नीत सोय ।वो हि बनकर ते रोवे। सांतो पांचो मार लगावे ।उतार सो पिछे खावें ।।४ ।।

सब ज्वानी निकल जावे। पीछे गधडी मट्टी खावे ।गांवढाल सो क्या लेवे ।हगवनी भरी नही धोवे ।।५।। मेरी दारु जिन्हे खाया ।

दिदार दरगां सो हि पाया ।तल्हे मुंढी घाल जावे ।बिगारी सोवे क्या लेवे।।६।। बजारका बुझे भाव ।वो हि पुसत आवे ठाव।

फुकट वाटु कहे तुका ।लेवे सोहि लेवो सखा ।।७।।

(संत तुकाराम महाराज गाथा) वारकरी बांधवांनो , कृपया हा अभंग समजून घेणे. हा अभंग संत तुकाराम महाराज यांनीच रचलेला आहे. तसेच मुस्लिम वारकरी बांधवांनी याचा उपयोग फक्त सामाजिक सांस्कृतिक धार्मिक आध्यात्मिक ऐक्यासाठीच करावा . काही उपद्रवी सनातनी कर्मठ धर्माभिमानी हिंदू वा मुस्लिम मंडळी जर या विरोधात जाऊन धार्मिक आध्यात्मिक क्षेत्रातील सामंजस्य, बंधुभाव एकात्मता शांतता बिघडवणारी विधाने करत असताना आढळले तर कृपया त्यांचे गैरसमज दूर होतील अशी वारकरी भूमिका घेणे... संत तुकाराम महाराजांच्या मते देव , भगवान, विठ्ठल, ईश्वर, अल्ला , अल्लाह , गॉड , उपरवाला आदि सर्वच एक आहेत . नांवे वेगळे आहेत . भक्ती सुफी लिंगायत महानुभाव वारकरी संतांचे विचार वैश्विक बंधुत्वाचे संबंध बळकट करण्यासाठी उपयुक्त ठरेल असे आहेत. पंढरपूर वारीत आपल्याला हे सख्य अनुभवायला मिळते. कृपया ते अजून बळकट करण्यासाठी या अभंगाचा उपयोग होईल याची काळजी घ्यावी. या अगोदरच्या अभंगात संत तुकाराम महाराज म्हणतात, देवाने जर आपल्याला सुबुद्धी दिली तर या जगात गाई आपल्या वासरासह वाघाबरोबर मित्रत्व करतील ... दरवर्षी पंढरपूर आषाढी वारीला गालबोट लावण्यासाठी काही निवडक विकृत मंडळी प्रयत्नरत आहेत असे लक्षात येते .. तरी कृपया सावध असावे... धन्यवाद व सदिच्छा.

पुरुषोत्तम खेडेकर, चिखली



# केंद्रातून आलेला निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात : दानवे

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** केंद्रातून आलेला निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होतो हि किमया पंतप्रधान मंत्री नरेंद्र मोदी मुळे शक्य झाले आहे .२०१४ पासून भाजप सरकार आहे. आजपर्यंत नऊ वर्ष पुर्ण झाले असून गरिबांसाठी विविध लाभ मिळवून दिले असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी केले. ते दि. २६ वार सोमवार रोजी पैठण शहरातील पितांबरी मंगल कार्यालय येथील आयोजित मोदी सरकारच्या ९ वर्ष पुर्ती व लाभार्थी संम्मेलनात बोलत होते यावेळी जिल्हाध्यक्ष विजय औताडे , लक्ष्मण औटे ,रेखाताई कुलकर्णी , कल्याण गायकवाड , तालुकाध्यक्ष डॉ सुनिल शिंदे ,चंद्रशेखर पाटील , विजय चाटूपळे , महादेव बटूळे ,बंडू आंधळे , योगेश सोलाटे , भाऊसाहेब काळे ,भाऊसाहेब बोरूडे ,संतोष खरात ,दत्तात्रय वाकडे,सिध्दार्थ परदेशी , कांताबापू औटे ,राजेंद्र आंबेकर आदींची प्रमूख उपस्थिती होती. माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे यांनी केंद्र सरकारच्या योजनेमुळे नागरिकांना मिळालेल्या लाभाचा पाडा वाचत लेखा जोखा सांगितला त्यात प्रामूख्याने प्रधानमंत्री आवाज योजना, उज्वला गँससह विविध नागरिकांचे कामे मार्गी लागल्याचे सांगितले.

पैठण तालुक्यात भाजपला चांगले वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या महिनाभरापासून भाजपचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते घरा - घरांत जाऊन लोकांशी संपर्क साधत आहेत. केंद्र सरकारच्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात केलेली विकास कामे , आणलेल्या योजना व जनहिताची कामे जनतेपर्यंत पोचविण्याचे काम केले जात आहे . त्यामुळे दांडगा जनसंपर्क झाला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निश्चित यश मिळवू , असे भाजपा तालुकाध्यक्ष सुनील शिंदे यांनी सांगितले.

पुढे बोलतांना मंत्री दानवे म्हणाले की, जगामध्ये दोन वर्षापुर्वी जगात महामारी कोरोनामुळे झाली होती. जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारत दुस-या क्रमांचा देश आहे. १४० कोटी पैकी ८० कोटी जनता गरीब आहे. कोरोना काळात केंद्र सरकारने गरीबांना मोफत धान्य वाटप करून गरीबांना मदत केली. उज्वला योजनेतून स्वस्तात गॅस दिले. बेघर लोकांना घरे दिली. शौचालय दिले, अशा विविध योजना दिल्या आहेत. म्हणून येणाऱ्या काळातही मोदीच पंतप्रधान झाले पाहिजे. तरच देशाची प्रगती होईल असेही मंत्री दानवे म्हणाले. यावेळी विशाल पोहेकर, कैलास बरकसे , सुनिल पटेकर, अनिल पवार, समिर शुक्ल, विजय ठाणगे, आनंता औटे, रवि क्षीरसागर, शिवनाथ सोनवणे, भिमराव खेडकर, महेश जोशी, सुचित्रा जोशी, दिपक गव्हाणे , आश्विनी लखमले, अँड नंदा जाधव ,रशिद कुरेशी आदीसह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते .

# लेणापूर येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील लेनापूर येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत 25 जून ते 01 जुलै दरम्यान कृषी संजीवनी सप्ताह साजरा केला जात आहे. या कृषी संजीवनी सप्ताहामध्ये कृषी पीक तंत्रज्ञान प्रसार दिन, पौष्टिक आहार प्रसार दिन, कृषी महिला सन्मान दिन, जमीन सुपीकता जागृती दिन, कृषी प्रक्रिया तंत्रज्ञान प्रसार दिन आणि शेवटी एक जुलैला कृषी दिनाच्या माध्यमातून समारोप होणार आहे.

सोयगाव तालुक्यातील मौजे लेनापुर येथे तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया, मंडळ कृषी अधिकारी रमेश गुंडीले यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी संजीवनी सप्ताह अंतर्गत पौष्टिक तृणधान्य दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात कार्यक्रमात सतीश बोरसे कृषी सहाय्यक यांनी पौष्टिक तृणधान्याचे मानवी आहारातील महत्त्व विषद केले. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, कृषी पिक तंत्रज्ञान पौष्टिक तृणधान्याचे मानवी आहारात असणारे महत्त्व व फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन व येत्या खरीप हंगामात जास्तीत जास्त प्रमाणात तृणधान्य पिकाचा पेरा करावा असे आवाहन कृषी पर्यवेक्षक समाधान चौधरी यांनी केले. कार्यक्रमाला कृषी सहाय्यक बी आर चौरे , विश्वजीत तायडे,सतीश बोरसे, प्रशांत जाधव व गावाचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी बांधव उपस्थित होते.





# दर्शन देशमुखचे नवोदय परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** येथील दर्शन महेश देशमुख या विद्यार्थ्याने नवोदय परीक्षेत विशेष प्राविण्यासह गुण संपादन करून घवघवीत यश मिळवून नवोदय विद्यालयाच्या पुढील शिक्षणासाठी पात्र ठरला आहे. त्यानिमित्त राजुरी येथील मित्र परिवाराच्या वतीने दर्शन देशमुख याचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचा शोध घेऊ त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून उच्च दर्जाचे शिक्षण देणे हा नवोदय परीक्षेचा मुख्य उद्देश आहे.या परीक्षेबाबत आता ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात जागृती झाल्याने जिल्हा भरातून हजारो विद्यार्थी परीक्षेत बसत असतात. दर्शन देशमुख ने या परीक्षेत ९७.५० टक्के गुण मिळवून यश मिळवले आहे. परतुर तालुक्यातील आंबा येथील नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी पासून पुढील शिक्षण घेण्यासाठी पात्र ठरला आहे. त्याबद्दल राजुर येथील मित्र परिवाराच्या वतीने दर्शन देशमुख याचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी प्रा. बाळासाहेब बोराडे, व्यापारी संघाचे कोषाध्यक्ष भीमाशंकर दारूवाले, डॉ. ईश्वर जटाळे, पोटे, थोटे, हरिदास निकम, आर.एच. दानवे, विनोद पांडे, विष्णू गवळी, गजानन लहाने, महेश देशमुख आदीजन उपस्थित होते. दर्शन देशमुख याने नवोदय परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज स्मारक सुशोभीकरणाच्या निधीत अपहार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरालगत रेल कनकावती नगर ग्रामपांचयत कारखाना परिसरातील छ. शिवाजीमहाराज स्मारक सुशोभीकरण निधीतील कामात गैरप्रकार व अपहार केल्या प्रकरणी ग्रामसेवक व सरपंच यांना निलींबीत करुन चौकशी करा असे निवेदन विस्तार अधिकारी एस .डी. चव्हाण व संतोष दारकुंडे यांना ग्रामस्थ व शिवप्रेमी यांनी दिले. रेल कनकावतीनगर ग्रामपंचायतला शिवाजी महाराज स्मारक शोभीकरण करीता शासनाकडुन निधी मंजूर झाला होता. या अंतर्गत महाराष्ट्राचे आराध्य असलेले छ.शिवाजीमहाराजांचा कनकावतीनगर कारखाना परिसरातील पुतळा व परिसर सुशोभीकरणा करीता 15 वा वित्त आयोग योजनेतून रु.2 लाख 26 हजारांचा निधी मंजूर झाला होता. या निधीचा अपहार केल्याचा ठपका शिवप्रेमींनी सरपंच व ग्रामसेवकावर ठेवला आहे. प्रत्यक्षात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व सुशोभीकरणावर कोणतेही कामावर शासकीय निधी खर्च झालेला नाही.प्रकरणी संबंधीत ग्रामसेवक व सरपंच यांच्या कडून अभिलेखात छेडछाड करुन पुरावे नष्ट केले जाण्याची दाट शक्यता असल्याने संबंधीत सरपंच व ग्रामसेवक यांना निलंबीत करुन दोषी विरुद्ध रितसर गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई व्हावी ही संतप्त शिवप्रेमी व ग्रामस्थांची मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी अभिजित देशमुख,योगेश मैराळ, सचिन वाळुंजे,योगेश कदम, अशोक डोंगरे, रितुराज देशमुख, बाळू लोखंडे, मंगेश जाधव,गोरख पवार,राजू वाघ, गंगा सूर्यवंशी, प्रदीप कदम, प्रमोद गायकवाड,नानासाहेब गायके, अरुण शिंदे यांची उपस्थिती होती.



# घरोघरी ज्ञानेश्वरी पारायण... जीवनाला नवी दिशा देणारा संकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लोकांमध्ये सकारात्मकता निर्माण व्हावी यासाठी आपल्या घरीच बसून ज्ञानेश्वरी पारायणाचा नाविन्यपूर्ण उपक्रम ज्ञानेश्वरीचे अभ्यासक प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी राबविला होता. यामध्ये मुंबई , धाराशिव, हैदराबाद, छत्रपती संभाजी नगरातील मिळून एकूण ८० महिला ६० पुरुषांनी सहभागी होऊन रोज ३०० ओव्यांचे पारायण केले. एकूण ३० दिवसांच्या केलेल्या पारायणास मोठा प्रतिसाद मिळालेला होता. त्यानंतर घरोघरी ज्ञानेश्वरी पारायणाच्या उपक्रमाच्या समारोप सोहळा सिडको एन-४ मधिल विघ्नहर्ता गणपती मंदिरात संतसाहित्याचे अभ्यासक विजय कुमार फड यांच्या अध्यक्षतेखालील संपन्नही झाला.

खरं तर आजच्या धावपळीच्या जीवनात अशी एक आध्यात्मिक वैचारिक बळ देणारी संकल्पना मनात येऊन सव्वाशे परिवारांना एकत्रित आणून ती आमलात आणणे ही गोष्ट ही विचारांच्या पलिकडीलच होती. आज प्रत्येकांच्या कडेच भरपूर पैसा..बंगला.. गाड्या.. असूनही त्यांच्या दैनंदिन जीवनातील सुख..शांती ..समाधान ..आनंद हारवलेले आहे.त्यामुळेच त्यांची नकारात्मकता वाढतं चाललेली आहे हे बाकी खरं... प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी आपल्या घरा.. घरांमधून ज्ञानेश्वरीच पारायण करा ही संकल्पना जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन देणारी ठरली. ज्ञानेश्वरी पारायण करणाऱ्या सौ.सुनीता चंद्रशेखर पाठक , डॉ.अरविंद मुळे , सौ.प्रणीता देशपांडे , अरविंद कुलकर्णी , डॉ.कुडे ..अशा ज्ञानेश्वरी पारायण करणाऱ्या बऱ्याच जणांच्या मनाचा कानोसा घेतला तेंव्हा अत्यंत पारदर्शकपणे त्यांनी दिलेली उत्तरे मनं सुखावणारी होती... ज्ञानेश्वरी पारायणा नंतर आमच्या आमच्यातच झालेला सकारात्मक बदलाचा अनुभव तर विलक्षण आनंददायी होता. काम , क्रोध , मंद , मत्सर यांची नव्यानं जाणीव झाली.त्यातून मी समोरच्याचे शांतपणे ऐकून घेवू लागलो. माझ्या मित्र.. नातेवाईकांच्यासाठी मदतीचा हात निस्वार्थी भावनेने पुढे करु लागल्याच माझ्या बायकोलाही जाणवू लागले. आपल्या जवळील ज्ञान..अनुभव... ज्यांना खरंच त्याची गरज आहे अशांना योग्यवेळी द्यावयास हवा आहे.आपणं आपल्या जीवनात सतत गुंतलेलो असताना आपणं आपणं आपलं कर्म करीत असतो.. ज्ञानही मिळवत असताना आपणं सकारात्मक दृष्टिकोन ठेवून ईश्वर भक्तीस उचित स्थान देऊन ईश्वर भक्ती साठी वेळही द्यावयास हवा आहे.ईश्वराचा वास सर्वत्र पसरला आहे प्रत्येकांमधेही ईश्वर असताना आपणं हे जाणून एक मेकांना मदतीचा हात पुढे केला पाहिजे. आम्हां सर्वांना या नित्य नियमाने ज्ञानेश्वरीच्या पठणाने नवी उर्जा मिळाली.. जगण्यासाठीचा नवा दृष्टिकोन मिळाला... बसं आणखी ते काय हवं आम्हां सर्वांना... प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णींच्या या नव्या संकल्पनेतून आम्ही सारेजणांनीच नियमितपणे ज्ञानेश्वरी पारायण केले नी आमच्या जीवनाचं सार्थक झाले असे आम्हाला वाटते हे बाकी खरं...आपणही आपल्या शहरात... आपल्या परिसरातील ज्ञानेश्वरी पारायणाचा अनमोल असा उपक्रम सुरू करा... आपलंही जीवन आनंदमय सुखमय सुजलाम सुफलाम होईल.





# मोटरसायकलींसह आरोपी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कित्येक दिवसापासून पिंपळनेर भागात मोटरसायकली चोरीचे सत्र सुरूच होते पोलीस अधीक्षक यांनी पिंपळनेर पोलीस निरीक्षक यांना आदेशित केले व दोन आरोपीला तात्काळ अटक करून वीस मोटरसायकली हस्तगत केल्या आहेत.

पिंपळनेर पोलीस ठाणेचे पोकों राकेश बोरसे यांना मो.सा. चोरी करणाऱ्या इसमांबाबत माहिती मिळाली होती. सदर माहीतीची पुष्टी करणेसाठी श्रीकृष्ण पारधी यांनी सुत्रे हाती घेतली व संपूर्ण तयार करून सापळा रचुन आरोपी शामील पांडु बागुल शिताफिने ताब्यात घेतले. सदर चोरास विचारपुस करता त्याने त्याचा साथीदार नामे रोशन सुरेश गायकवाड देशशिरवाडे येथुन तक्रारदार यांचे घराचे अंगणातुन तसेच बोपखेल गावातुन तक्रारदारांचे घराजवळून मो.सा. चोरी केल्याची कबुली दिली. तसेच साक्री पोलीस ठाणे हददीतील दिघावे गाव येथुन देखील मो.सा चोरी केल्याची कबुली दिली याशिवाय नाशिक ग्रामिण जिल्हयातील छावणी मालेगाव कॅम्प वडनेर ठाकुर्डी , सटाणा परिसरातील देखील जवळपास २० मो.सा. चोरी केल्याची कबुली दिली. त्यावरुन आरोपी क्रं १ ) शामील पांडु बागुल, वय २९, रा शेंदवड, ता. साक्री २ ) रोशन सुरेश गायकवाड वय २३, रा. विरगांव, ता. बागलाण जि. नाशिक यांचेकडुन २० चोरीस गेलेल्या मो.सा. हस्तगत केल्या आहेत. पिंपळनेर पोलीसांचा अधिक तपास सुरु आहे. आनखी मो.सा. चोरीचे प्रकार उघडकिस येण्याची शक्यता आहे. एकूण ६,२५,०००/-चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयातील तक्रारदार शेतकरी असल्याने चोरटयांनी चोरुन नेलेल्या मोटार सायकली पोलीसांकरवी मिळुन आल्याने आनंद व्यक्त करुन पोलीसांचे कौतुक करीत आहेत. तरी नागरीकांना आव्हान आहे की, आपण पिंपळनेर पोलीस ठाणेत येवुन कागदपत्रासह मोटार सायकलीची खात्री करवुन घ्यावी. तसेच कागदपत्राची खात्री केल्याशिवाय कमीकीमतीत मिळत असलेली मो.सा. परस्पर विकत घेवु नये, सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक संजय बारकुंड सो, मा. अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, मा. उप विभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे, यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी श्रीकृष्ण पारधी, भाईदास मालचे लक्ष्मण गवळी, पोहेकॉ / कांतिलाल अहिरे, प्रकाश सोनवणे, अतुल पाटील,भास्कर सुर्यवंशी, राकेश बोरसे, प्रणय सोनवणे,पंकज माळी, विजयकुमार पाटील, रविंद्र सुर्यवंशी, पंकज वाघ, दावल सैंदाणे, नरेंद्र परदेशी अशांचा सहभाग आहे.

# 'पॉक्सो' गुन्ह्यातील आरोपीची निर्दोष मुक्तता

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिचे फोटो इंस्टाग्राम वर व्हायरल करण्याच्या गुन्ह्यातील आरोपी गोपाल मधुकर जाधव याची परभणी येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.


यापकरणी पीडित अल्पवयीन मुलीने दि. 25 सप्टेंबर 2020 रोजी जिंतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती की, आरोपी गोपाल मधुकर जाधव याने तिचा विनयभंग करून, विनयभंग करतानाचे काढलेले फोटो तिच्या वडिलांच्या व्हाट्सअॅप वर पाठवले तसेच इंस्टाग्राम वर व्हायरल केले आणि धमकी दिली. पीडित मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी गोपाल मधुकर जाधव याच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम 354 (क), 354 (ड), लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायद्याच्या कलम 8, 12 आणि माहिती व तंत्रज्ञान कायद्याच्या कलम 67, 67(अ), 66(ड) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर या प्रकरणाचा तपास करून जिंतूर पोलिसांनी आरोपी विरुद्ध परभणी येथील विशेष न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

तब्बल अडीच वर्षे चाललेल्या या खटल्यात सरकारी पक्षातर्फे अनेक साक्षीदार तपासण्यात आले व आरोपीतर्फे त्यांची उलटतपासणी अॅड. सुनिल बुधवंत यांनी घेतली. त्यांनी, या प्रकरणात एफ. आय. आर. दाखल करण्यात झालेला उशीर, पीडित मुलीच्या वडिलांची साक्ष न होणे, तथाकथितरित्या पीडितेचे फोटो असणारा मोबाईल न्यायालयासमोर सादर न करू शकणे, तसेच संबंधित व्हाट्सअॅप व इंस्टाग्राम अकाउंट ची माहिती न्यायालयासमोर न येणे इत्यादी बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. सर्व साक्षी पुरावे तपासल्यानंतर सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील यांनी अंतिम युक्तिवाद केला तर आरोपीतर्फे अॅड. सुनिल बुधवंत यांनी, फिर्यादी व अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या साक्षीने सदरचा गुन्हा सिद्ध होत नसल्यामुळे तसेच फिर्यादी मुलीला आरोपी सोबत लग्न करावयाचे होते परंतु आरोपीने तिला प्रतिसाद न दिल्यामुळे आरोपीवर दबाव टाकण्यासाठी हा खोटा गुन्हा दाखल केल्यामुळे आरोपीस निर्दोष मुक्त करण्याबाबतचा अंतिम युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा अंतिम युक्तिवाद ऐकल्यानंतर तसेच न्यायालयासमोर आलेल्या साक्षीपुराव्यांच्या व उलटतपासणीच्या निरीक्षणांती, परभणी येथील प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर यांनी दिनांक 22 जून 2023, गुरुवार रोजी आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.

# माजी आमदार रोहिदास चव्हाणच सेनेकडून विधानसभा लढवणार

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** कंधार मतदारसंघात काही पक्षाचे नेते मंडळी



द्वेषापोटी विनाकारण आफवांचे पेव आणत आहेत.लोहा कंधार मतदार संघाचे सलग दोन टर्म प्रतिनिधित्व करत संपूर्ण जिल्हा भगवामय करत नांदेड जिल्ह्याची धुरा सांभाळणारे शिवसेनेतील ज्येष्ठ नेते,माजी आमदार रोहिदासराव चव्हाण यांच्या नावाचा अपप्रचार करत आहेत. परंतु पक्षाचा आदेश घेऊन शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षातर्फे लोहा कंधार मतदार संघाचे तिकीट घेऊन माजी आमदार रोहिदास चव्हाणच निवडणूक लढवणार असल्याचे प्रतिपादन नवनाथ बापू चव्हाण लोहा कंधार मित्रपरिवार च्या वतीने करण्यात आले आहे.

माजी आमदार रोहिदास चव्हाण हे १९८६ पासून तळागाळातील,गोरगरीब, सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचलेले एकमेव शिवसेना पक्षातील निष्ठावंत, लोहा कंधार मतदारसंघातील नेतृत्व असुन त्यांच्या वर विरोधकांकडून चिखलफेक करून स्वतः चे नांव मोठे करण्यासाठी करत आहेत.माजी आमदार रोहिदास चव्हाण पक्ष निष्ठा,संयम, निष्कलंक, चारित्र्य संपन्न व पुर्वीपासून पक्षाच्या आदेशानुसार प्रामाणिकपणे अंमलबजावणी करणारे वारकरी संप्रदायाचा वारसा चालवणारे , अजूनही शहरासह व लोहा कंधार मतदार संघा सहित नांदेड लातूर व परभणी जिल्ह्यातील जनतेशी अतिशय जवळीकता असणारे एकमेव खंबीर नेतृत्व आहेत. मराठवाड्यात पहिल्यांदाच धर्माबाद उमरी या नगरपालिका माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली लढून त्या नगरपालिकेवर सत्ता स्थापन केली १९९०साली ते अल्पशा मताने पराभूत झाले पण नांदेड या ठिकाणी तत्कालीन आमदार डॉ. डी. आर. देशमुख यांना निवडून आणले. हजारो युवकांना, नागरिकांना राजकारण्यांना, समाजकारण्यांना त्यांनी घडवले. माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या आमदारकीच्या काळात लोहा व कंधार पंचायत समिती येथे १० ते १२ सभापती झाले असून, कलंबर सहकारी साखर कारखाना, लोहा व कंधार खरेदी विक्री संघ तसेच तालुक्यातील बऱ्याच ग्रामपंचायती त्यांच्या ताब्यात होत्या. त्यांच्या कार्यकाळात जातीय एकोपा होता. तसेच सर्वधर्मसमभाव वागत होते. आज घडीला राजकारणी लोकांनी जाती-जातीत तेढ निर्माण करून प्रत्येक ठिकाणी वाद निर्माण करण्याचे प्रयत्न केले असे दिसून येते. काळानूरुप अनेकांनी त्यांची साथ सोडली तरीही ते डगमगले नाहीत.परंतू सद्या काही पक्षातील विघ्नसंतोषी लोक, विरोधक स्वतः ची पोळी भाजून घेण्यासाठी जाणीवपुर्वक माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या नावाचा अपप्रचार करत आहेत.लोहा कंधार मतदार संघात काही पक्षाचे नेते मंडळी द्वेषापोटी रोहिदास चव्हाण हे विधान सभेची लढविणार नसल्याच्या अफवांचे पेव आणत आहेत.अफवा पसरवत आहेत. परंतु त्यांच्या अफवांना पक्षातील व लोहा कंधार मतदारसंघातील लोकांनीं विरोधकांच्या अफवांना बळी पडू नये.

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार तथा लातूर जिल्हा संपर्कप्रमुख रोहिदास चव्हाण पक्षाचा आदेश घेऊन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून लोहा कंधार मतदार संघाचे उमेदवारी घेऊन माजी आमदार रोहिदास चव्हाण निवडणूक लढवणार असल्याचे नवनाथ बापू चव्हाण मित्रपरिवार लोहा-कंधारच्या वतीने सांगितले आहे.

# वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी बरसल्या

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** गेल्या एका महिण्यापासून शेतकरी राजा पाण्याच्या प्रतीक्षेत आहे. पण पाऊस काही पडत नव्हता. शेताची नागवटी वखरटी करून पाऊस येइल आणि शेताची पेरणी करू या भाबड्या आशेवर तो बसला होता.प ण उगवणरा प्रत्येक दिवस कोरडाचा जात होता. भर पावसाळ्यात उन्हाची तीव्रता जाणवत होती. पण अखेर प्रतीक्षा संपली. थांबलेला मान्सून सक्रिय झाला अन् वादळी वाऱ्यासह विजांच्या आगमनात पावसाने हजेरी लावली. तालुक्यातील बागायतदार शेतकऱ्यांनी महिना अगोदर कपाशीची लागवड केली होती. उनापुरा एक महिना होता आला विहिरीच्या, बोअरवेलच्या पाण्यावर कपिशीच पिके तग धरून होते. पण पावसाचा पंत्ताच नव्हता. आज अखेर पावसाने दस्तक देत संकटात सापडलेल्या शेतकऱ्याना आधार दिला आहे. त्यामुळे बळीराजा



सुखावला आहे.संपूर्ण महाराष्ट्रात मान्सून सक्रिय झाल्याने पावसाच संकट टळलं आहे.शकतो तरी राजाला मोठा दिलासा मिळाला आहे.यंदा एक महिन्याने पाऊस उशिरा आल्याने शेतकऱ्यासह सर्व सामान्य माणूस मेटाकुटीला आला होता. पण उशीरा का होईना अखेर पावसाच्या सरी बरसल्या अन् शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हसू उमटलं.




# मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** नांदेड जिल्ह्यातील अक्षय भालेराव खून प्रकरणी मारेकऱ्यांचा निषेध आणि त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून येत्या २७ जून रोजी खंडाळा येथे भव्य जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा मोर्चा जास्तीत जास्त जन संख्येने व्हावा यासाठी आयोजकांकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत.

आम्ही या मोर्चात सहभागी होणार आहोत असा सकारात्मक प्रतिसाद सुद्धा बौध्द बांधवांकडून दिला जात आहे. दिनांक २४ जून रोजी शिंदेवाडी, विंग, भाटघर, मिरजे, कर्णवडी आदी भागातून तसेच इतर गावातील बांधवांशी फोन द्वारे संपर्क साधत मोर्चा संबंधी माहिती देण्यात आली.गाव भेटी दरम्यान लोकांशी संवाद साधत असताना जयकुमार खरात,गोविंदराव जावळे,संजय जाधव,नितीन कदम आदी उपस्थित होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व तालुक्यातील आंबेडकरवादी विविध संघटनांकडून हा मोर्चा घेण्यात येत आहे. राज्यात ठीक ठिकाणी बौद्ध बांधवांवर अन्याय अत्याचार घडत आहेत.या स वाचा फोडण्यासाठी खंडाळा तालुक्यातील बौद्ध समाज हा २७ जून रोजी एकत्रित येत आहे. बौद्धांवर वाढत्या अन्याय अत्याचाराकडे सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे.अशा प्रकारे क्रूर घटना घडविणाऱ्याना फाशीची शिक्षा देण्यात यावी ही प्रमूख मागणी मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.विविध पक्षीय संघटनांचे नेते मंडळी,

पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आलेले आहे.मोर्चाची सुरुवात एसटी खंडाळा स्टँड पासून होणार आहे.मोर्चा तहसील कार्यालया पाशी आल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व संविधानातील उद्देशिकाचे वाचन करण्यात येणार आहे.गाव भेटी दरम्यान लोकांचा मोर्चाच्या अयोजनास चांगला प्रतिसाद मिळत असून मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याचे आश्वासन लोकांकडून देण्यात आलेले आहे.सद्यस्थितीत पावसाळ्याचा मोसम सुरू झाला असून मोर्चा दिवशी पाऊस आला तरी मोर्चा होणार असल्याचे सांगण्यात आलेले आहे.पावसापासून संरक्षण म्हणून मोर्चेकऱ्यांनी येताना छत्री,रेनकोट घेऊन यावेत.असे म्हटलेले आहे.या मोर्चासाठी सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन सुद्धा करण्यात येत आहे.

# प्रकल्पग्रस्तांच्या आनंदाला उधाण

## आमदार डॉ. संजय कुटे यांचा निवासस्थानी सत्कार


आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** जिगाव प्रकल्पातील बुडीत गाव क्षेत्रातील अनेक गावांचे शेतीचे निवाडे या चार वर्षात जाहीर झाले. खऱ्या अर्थाने जिगाव प्रकल्प हा शेतकऱ्यांच्या हरितक्रांतीचे स्वप्न उराशी घेऊन येणारा प्रकल्प परंतु आहे. खरे तर जीगाव प्रकल्पात या शेतकऱ्यांच्या, प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी सरकार अधीग्रहीत करित आहे. त्या शेतकऱ्यांचा त्यागातून, बलिदानातून हा प्रकल्प समोर जात आहे. याच बाबीचा विसर प्रशासनाला व महाविकास आघाडी सरकारला पडला होता. नवीन भूसंपादन कायदा 2013 अस्तित्वात आला खरा परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी सरकार व प्रशासन करीत नव्हते. त्यामुळे प्रकल्पग्रस्त त्यांच्या हक्काच्या मोबदल्यापासून वंचित होते. आपली लाख मोलाची जमीन जाऊन सुद्धा सरकार त्याचा योग्य मोबदला देत नव्हते त्यामुळे प्रकल्पग्रस्तानमध्ये आणि पूर्णाकाठच्या गावांमध्ये नाराजीचा सुर उमटत होता.शेतकऱ्यांना अनेक आंदोलने करावी लागली, पोलिसांचा मारही खावा लागला. मेटाकुटीला आलेले प्रकल्प ग्रस्त हतबल झाले होते. खऱ्या अर्थाने कलम 11 वर घेतलेल्या आक्षेप व हरकतीनुसार कलम 15 ( 2 ) नुसार निवाडे जाहीर व्हायला पाहिजे होते. परंतु तसेच झाले नाही. दादुलगाव हिंगणे मानकर या गावाची निवाडे ही नमुना ड शिवाय जाहीर झाली. प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या हक्काच्या मोबदल्यापसून वंचित रहावे लागले. एकप्रकारे शासन प्रशासन या प्रकल्पग्रस्थांना आशेवर ठेवत घोर नीराशा करत होते. याच मागणीला धरून जळगाव जामोद मतदार संघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांनी जिल्हाधिकारी व भूसंपादन अधिकारी बुलढाणा यांच्या समवेत बऱ्याच बैठकी घेतल्या. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रकल्पग्रस्तांना स्वतः घेऊन दोन दिवस ठिय्या आंदोलन केले. परंतु काही फलित झाले नाही. कारण शेतकऱ्यांच्या मानगुटीवर महाविकास आघाडीचे सरकार बसले होते. त्यांना शेतकऱ्यांचे काही देणे घेणे नव्हते. भाजपा सेना युतीचे सरकार येताच. लोकांनी निवडून दिलेले सरकार येताच आदरणीय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्या ज्या शेतकऱ्यांच्या मालमत्ता ह्या संयुक्त मोजणी मधून वगळण्यात आल्या होत्या त्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी संपूर्ण जिगाव प्रकल्पाकरिता 62 कोटीची अनुदान जाहीर केले व त्यासाठी प्रकल्पग्रस्तांचे आमदार संजयजी कुटे यांनी या गोष्टीचा सातत्याने पाठपुरावा केला त्यांच्या पाठपुराव्यामुळेच ही अशक्य वाटणारी गोष्ट शक्य झाली म्हणूनच आजप्रकल्पग्रस्तांच्या वतीने आमदार संजयजी कुटे यांचा सत्कार केला यावेळी जिल्हा परिषद पिंपळगाव काळे चे सदस्य आदरणीय बंडूभाऊ पाटील, मनोहर खाळपे ,दादुलगाव चे सरपंच श्री शिवचरण घ्यार,हिंगणा मानकर चे सरपंच विजय काळदाते. देविदास पाटील लक्ष्मण अटकर, विठ्ठल पाचपोर संतोष पाटील, मोहन मानकर सुभाष पाटील शेषराव पाटील अनंता घ्यार, सुभाष पैसोडे, सुनील पैसोडे, गजानन सुशीर ,पुरुषोत्तम झाल्टे यांच्यासह अनेक प्रकल्पग्रस्तांची उपस्थिती होती.



गेल्या अनेक वर्षांपासून नवीन भूसंपादन कायदा २०१३ची कायदेशीर अमलबजावणी सरकार व प्रशासन करत नव्हते .त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या हक्काच्या मोबदल्यापासून वंचित राहावे लागत होते . परंतु आमदार संजयजी कुटे यांनी ज्या शेतकऱ्यांच्या मालमत्ता संयुक्त मोजणी मधून वगळण्यात आल्या होत्या . त्यांना जल संपदा विभागाच्या नियामक मंडळा कडून ६२कोटी मंजूर करून घेतले .सरकारचे व आ .संजय कुटे यांचे जाहीर आभार . **मनोहर खाळपे प्रकल्पग्रस्त शेतकरी .**



# २८ जूनला शेवटचा विवाह मुहूर्त

आधुनिक केसरी न्यूज

**एकनाथ आवचार**

**चारठाणा :** जून या लग्नसराईच्या शेवटच्या महिन्यात २६, २७ व २८ हे तीन विवाह मुहूर्त शिल्लक आहेत. २८ जून हा शेवटचा मुहूर्त असून, नव्या लग्नसराईला नोव्हेंबरमध्ये सुरुवात होणार आहे.

नवीन लग्नसराईला नोव्हेंबरपासून सुरुवात होणार असून, नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत एकूण ४४ विवाह मुहूर्त आहेत, अशी माहिती आहे. दरम्यान, या वर्षातील देवशयनी आषाढी एकादशी ही २९ जून रोजी येत असून, या दिवसापासून चातुर्मास सुरू होत आहे. दि. २९ जूनपासून ते देव प्रबोधिनी एकादशी ( कार्तिकी एकादशी ) पर्यंत भगवान विष्णू हे शयन करतात, म्हणून या काळात संभवतः मुहूर्त नसतात, असे म्हटले जाते. परंतु आता बदलत्या काळात चातुर्मासातही गौणकाळातील मुहूर्त आपत्कालीन परिस्थितीत घ्यावे, असा खुलासा पंचांगात केलेला आढळतो. पावसाळ्यातही आपत्कालीन मुहूर्तावर उपवर वधू-वरांचे विवाह होताना दिसत आहेत. **आपत्कालीन मुहूर्तनुसार :** जून - ३० जुलै १,२,४,५,९,१०, ११, १४ ऑगस्ट २२, २६, २८, २९, सप्टेंबर - ३, ६, ७, ८, २४, २६, २७, ऑक्टोबर १६, २०, २२, २३, २४, २६. **नियमित मुहूर्त :** नोव्हेंबर २७, २८, - २९ डिसेंबर - ६, ७, ८, १५, १७,२०, २१, २५, २६, ३१ जानेवारी - २, ४, ५, ६, ८, १७, २२, २४, २७, २८, ३०, फेब्रुवारी - २, ६, १२, १३, १७, १८, २४, मार्च - ३, ४, ६, १६, १७, २६, २७, ३०.

# जातीप्रथेचे निर्मूलन करण्यासाठी कृतिशील चळवळ जगणारा राजा राजर्षी शाहू महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**राजरत्न भोजने**

**औरंगाबाद :** दलितांवरील अन्याय अत्याचार दिवसेंदिवस वाढत असल्याने नांदेड येथील अक्षय भालेराव मारल्या जातो. या महाराष्ट्रात अश्या कित्येक क्रूर घटना घडत आहेत. येथील जातीयवाद थांबवण्यासाठी आपण आता जागे होवून, बहूजन तरूणांनी समाजामध्ये जावून प्रबोधन केले पाहिजे. आज आरक्षणामुळे नोकऱ्या, गाड्या, पैसा, जमिनी, सर्व अधिकार मिळत असल्याने,आरक्षण समाज परिवर्तनाची संधी आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळाले,मात्र सामाजिक स्वातंत्र्य शाहू महाराजांनी मिळवून दिले. शाहू महाराजांनी जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी कृतिशील उपक्रम राबविले.ज्यामध्ये त्यांनी विविध जातीतील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे, उभारले होते. शिक्षण मोफत व सक्तीचे केले. आपल्या संस्थांनामध्ये अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांसाठी नोकऱ्यांमध्ये पन्नास टक्के आरक्षण देवून, शाहू महाराजानी बहुजन समाजासाठी व्यवसाय उभारले, अशा प्रकारे जातीचे निर्मुलन करण्यासाठी शाहू महाराजांनी चळवळ उभी केली. शाहू महाराजांचा आदर्श घेवून तथाकथीत सरकार आणि समाजातील तरुणांनी जाती नष्ट करण्यासाठी काम केले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ.सिद्धार्थ टाकणखार यांनी केले आहे. बहुजन विद्यार्थी आघाडी,"कही हम भूल न जाये" या कार्यक्रमा अंतर्गत राजर्षी शाहू महाराजआणि जाती निर्मूलन एकदिवसीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महापुरुषांच्या प्रतिमांचे पुजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. रविवार, दि.२५ रोजी, पी.ई.एस. पॉलीटेक्निक महाविद्यालयात हा कार्यक्रम पार पडला. या वेळी कार्यक्रमाचे उद्घाटक,जयश्री सोनकवडे ( प्रादेशिक उपायुक्त सामाजिक न्याय विभाग औरंगाबाद ) प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ. सिद्धार्थ टाकणखार, ( सामाजिक कार्यकर्ते, बीड ) कार्यक्रमाचे अध्यक्ष,टी.एम.कदम ( प्राचार्य पी.ई. एस.पॉलिटेक्निक,कॉलेज ),प्रा.प्रदिप रोडे, ( सामाजिक कार्यकर्ते, बीड ) उपस्थित होते. प्रास्ताविक बहुजन विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रणित भोजने यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रल्हाद तारू,राहुल ढेंबरे यांनी केले. आभार रविंद्र मोरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा.संतोष प्रधान,विनोद खरात,संदीप अबगड,राहुल घोरपडे,संतोष लहाने,उत्तम कांबळे,गजानन प्रधान,प्रज्वलित बनसोडे,किशोर ससाणे, गजानन लांडगे प्रकाश प्रधान,अरुण पावरा,आदींनी परिश्रम घेतले.

**विद्यार्थ्यांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करावे :जयश्री सोनकवडे**

डिजिटल युगात माणसापेक्षा पैशाला किंमत आहे .आपल्या समाजामधून काही लोकांमुळे विश्वास हार्यता नष्ट होत आहे . विद्यार्थी महापुरुषांचे विचार विसरत असून हे विचार आत्मसात करावे . विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर कमी करावा . अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करावे . सामाजिक न्याय विभागाच्या विविध शिष्यवृत्ती योजना आहेत .आम्ही दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती देत असतो . "संविधान को तू जिंदा रख" या कवितेचे वाचन करून समाजातील वास्तवादी घडणाऱ्या घटनेवर प्रकाश टाकून जयश्री सोनकवडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले .





# औद्योगिक वसाहत येथे अग्निशमन केंद्राचे आ. फारूक शाह यांच्या हस्ते शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येथील अवधान शिवारात असलेला MIDC चा विस्तार वाढत असून MIDC भागात सुरक्षेचे कोणतेच साधन उपलब्ध नव्हते त्यामुळे त्याभागात कारखांण्यांना आगी लागण्याच्या घटना घडत होत्या, त्यामुळे करोडो रुपयाचे नुकसान व्यापारांचे होत होते. म्हणून सुसज्ज अग्निशमन केंद्राची अत्यंत गरज होती. त्यादृष्टीने धुळ्यातील उद्योजकांनी आ.फारुख शाह यांचेकडे सुसज्ज अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी केली होती.त्यानुसार आ.फारुख शाह यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या निदर्शनास आणून दिले.

आ.शाह यांची मागणी लक्षात घेवून उद्योग मंत्र्यांनी निधी मंजूर केला. गेल्या काही दिवसांपूर्वी मधुर इंडस्ट्रीज आणि केशरानंद जिनिंगला प्रमाणात आग लागली होती. या ठिकाणी धुळे महानगरपालिकेतून अग्निशमन दलाच्या गाड्या बोलावल्या होत्या परंतु धुळे शहरातून एम. आय. डी. सी. कडे जाणारा रस्ता हा खूप जास्तीचा वर्दळीचा व शहरापासून १० किमी अंतराचा असल्यामुळे अग्निशमनची गाडी वेळेवर घटनास्थळी पोहचली नाही. परीणामी मोठ्या प्रमाणात उद्योजकांचे नुकसान झाले होते. या घटनेमुळे फायर स्टेशनची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. तसेच एम.आय.डी.सी.तील सर्व औद्योगिक संघटना स्वतंत्र फायर स्टेशन होण्याकामी प्रयत्नशील होते. तसेच ऑगस्ट २०१६ मध्ये औद्योगिक संघटनांनी फायर सेस भरण्यास तयार असल्याचा ठराव केला. या ठरावाचे पत्र एम.आय.डी.सी प्रशासनाला दिल्या नंतरही सहा वर्षाचा कालावधी उलटला असूनही फायर स्टेशन झाले नव्हते आ. फारूक शाह यांच्या प्रयत्नाने हे फायर स्टेशन मंजूर होऊन या ठिकाणी सुसज्ज असे फायर स्टेशन होणार असून त्याचा आज आ. फारूक शाह यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या फायर स्टेशनमध्ये दोन फायर फायटर गाड्या सहित अन्य साधने राहणार आहे तसेच आमदार फारूक शाह यांच्या प्रयत्नाने सुसज्ज अशा विभागीय कार्यालय इमारती साठी सुद्धा निधी मंजूर करण्यात आलेला आहे.याकामाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून काम सुद्धा लवकरच सुरु होणार आहे, या कार्यक्रमाला आ.शाह यांचे सोबत हाजी छोटू शाह,नगरसेवक आमिर पठाण,प्यारेलाल पिंजारी, निजाम सय्यद, MIDC चे अभियंता स्वप्निल पाटील, अभियंता मोहिते,डॉ.बापुराव पवार, इकबाल शाह,जमील खाटीक,अनिस शाह,आसिफ शाह शहरातील उद्योजक व अधिकारी उपस्थित होते.

# शाळा व्यवस्थापन सक्षमीकरण प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** ISO जिल्हा परिषद उच्च प्रा. शाळा मल्हारा येथे शाळा व्यवस्थापन समिती सक्षमिकरण प्रशिक्षण खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. शासनाच्या आदेशानुसार महाराष्ट्रा मधील प्रत्येक शाळेवरील शाळा व्यवस्थापन समिती सक्षम होण्यासाठी, प्रशिक्षण देण्यात आले. ज्या सुलभाकांनी जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेतले त्यांनी तालुकास्तर सुलभकांना देऊन त्या सुलभाकांनी प्रत्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षक यांना द्यायला शासनाने आदेशीत केले होते. त्या हेतूने ISO जिल्हा परिषद शाळा मल्हारा येथे प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षणात बबलू कराळे यांनी सुलभकाची उत्तम भूमिका पार पाडली. सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तथा सर्व शिक्षक यांचे समाधान सुलभक बबलू कराळे यांनी केले. केंद्रप्रमुख श्रीकृष्ण उघडे, उच्च श्रेणी मुख्याध्यापक शीला सोळंके यांनी महत्वाची भूमिका पार पाडली.



# वैजापुरात लोकराजा राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म दिन सामाजिक न्याय दिन म्हणून राज्यभर पाळतात त्याचाच एक भाग म्हणून सोमवार( ता,२१ ) रोजी सकाळी दहा वाजता येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात शहरातील विविध थरातील नागरिकांनी एकत्र येऊन सामाजिक न्यायाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सामाजिकता जपण्याचा संकल्प केला. प्रथम सर्व उपस्थितांनी छत्रपतीशाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले नंतर,त्यांना माजी शिक्षणाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी संकल्प दिला. या प्रसंगी माजी नगरसेवक दशरथ बनकर, स्वप्नील जेजुरकर, जगन गायकवाड, दिलीप अनर्थे, मोती वाघ, अण्णासाहेब ठेंगडे, गिरीश चापानेरकर, गौरव दौडे, रतीलाल गायकवाड, प्रमोद निकाळे,रमेश त्रिभुवन, राहुल बनकर यांची उपस्थिती होती.



# विठूरायाच्या दर्शनासाठी वारकऱ्यांची मांदियाळी पंढरीकडे

आधुनिक केसरी न्यूज

**बंडु खडांगळे**

**लखमापूर :** संपदा सोहळा नावडे मनाला । लागला टकळा पंढरीचा ॥1॥ जावे पंढरीसि आवडे मनासि । कधी एकादशी आषाढी हे ॥2॥तुका म्हणे ऐसे आर्त ज्याचे मनी । त्याची चक्रपाणी वाट पाहे ॥3॥ या संत तुकोबांच्या संत वचनाप्रमाणे प्रत्येक आषाढी कार्तिकी एकादशीला पांडुरंगाच्या भेटीची ओढ महाराष्ट्रातील सर्व वारकरी बांधवांना लागलेली असते. मागील दोन तीन वर्षांपुर्वी करोनाने असंख्य वारकरी बांधवांना आपल्या लाडक्या विठुरायाचे दर्शन दुर्मिळ झाले होते. परंतु यंदा मात्र विठुरायाने आपल्या सर्व वारकरी बांधवांना जणू काही आपल्या भेटीचे निमंत्रणच दिले असे चित्र दिसत आहे. त्यामुळे यंदा पाऊले चालती पंढरीच्या वाटे याप्रमाणे महाराष्ट्रांच्या कान्याकोप-यातुन पांडुरंगाच्या दर्शनासाठी लाखो भाविक भक्ताची मांदीआळी पंढरीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. महाराष्ट्रांतील तमाम वारकरी बांधवाचे पवित्र दैवत म्हणून विठुरायाकडे पाहिले जाते. कारण तुकोबा म्हणतात विठेवरी ज्यांची पाऊले समान ,तोच एक दान शुरदाता !! कोणीही पंढरीत गेले तर त्यांला मोक्ष मिळतो.पंढरीचे वारकरी ते मोक्षांचे अधिकारी त्यामुळे मोक्षाची प्राप्ती होण्यासाठी भाविक मोठ्या धार्मिक भावनेने पंढरपूरात आषाढी कार्तिकी ला मोठ्या प्रमाणावर हजेरी लावतात. वारकरी सांप्रदायात आषाढी एकादशी एक महत्त्वाचा पर्वकाळ मानला जातो. तसेच ही एक महान पर्वणी समजली जाते.

त्यामुळे लाखो वारकरी या पर्वकाळाची आतुरतेने वाट पाहात असतात. सुंदरते ध्यान उभे विठेवरी हे रुप पाहाण्यासाठी वारकरी भक्त जीवाची तळमळ करीत असतो. यंदा ग्रामीण भागातील हजारो दिंड्या पंढरीकडे जात आहे. कारण दोन तीन वर्षांपासून आपल्या लाडक्या पांडुरंगाचे मनमोकळेपणाने दर्शन घेता आले नव्हते. परंतु यंदा मात्र ते दर्शन मिळणार असल्याने तमाम वारकरी बांधवाचा आनंद व्दिगुणीत झाला आहे. आषाढी एकादशी महात्म्य कथा एकेकाळी भगवान शंकर यांनी प्रसंग होत मृदुमान्य नावाचा राक्षसाला इतर कोणाकडूनही न मरता केवळ एका स्त्रीच्या हातून मरशील असा वर दिला होता.

या वरामुळे मृदुमान्य हा राक्षस खुपच उन्मत झाला होता आणि त्यानी आपल्याला कोणतीही स्त्री मारु शकत नाही, असा मनात विश्वास ठेवत देवावर स्वारी केली. त्यामुळे अन्य देवांनी भगवान शंकराकडे मदतीसाठी धावा केला. पण वर दिल्यामुळे भगवान शंकर यांनी काहीही करता येत नव्हते. पण त्याचवेळी देवाचा श्वासातून एक देवी निर्माण झाली आणि तीने मृदुमान्य राक्षसाला ठार केले. या मंगलमय दिवशी तुफान पाऊस पडत असल्याने सर्व देवतांना स्नानही घडले. तसेच सर्वजण राक्षेस मरे पर्यंत गुहेत लपुन राहिल्याने या दिवशी त्यांना संपुर्ण दिवस उपवास घडला. या देवीचे नाव होते ते एकादशी. त्यामुळे या दिवशी एकादशीचा उपवास करण्याचा प्रघात पडला. शास्त्र व वेदानुसार जी व्यक्ती या दिवशी भगवान विष्णूसह एकादशी देवीची मनोभावे उपासना करते त्यांना विविध पापातून मुक्तता मिळते. तसेच उत्तरोउत्तर प्रगतीसाठी आषाढी एकादशीची उपासना

वारकर्यांना महत्त्वाची वाटते. त्यामुळे आषाढी वारी व वारकरी हे समीकरण परिसासारखे आहेत. आजही लाखो वारकरी आपल्या जीवनाचे सार्थक करण्यासाठी पंढरपुरीची पायी वारी करतात व आपले जीवन भगवतांच्या सेवेसाठी अर्पण करतात. त्यामुळे तुळशीमाळ गळा गोपीचंदन टिळा ह्रदयी कळवा वैष्णवांचा ही संत वचनाची



खरी आठवण यातून होते. पंढरपुर वारी पंढरपूर मधील विठुराया हे अवघ्या महाराष्ट्राचे मुख्य दैवत असुन आषाढी एकादशीला येथे तमाम वारकरी बांधवाचा मोठा मेळा भरत असतो. महाराष्ट्रांच्या कानाकोपर्यातुन ठिकठिकाणाहून लाखो भाविक लोक पांडुरंगाच्या नामाचा गजर करीत पायी चालत जातात.हिलाच आषाढीची वारी म्हणतात. विठुरायाच्या नामघोष करीत अगदी भक्ती भावाने पंढरीत दाखल होतात व चंद्रभागेत स्नान करुन पांडूरंगाचे दर्शन घेतात. आषाढीला लाखो दिंड्या पंढरीत येवून विठू रायाच्या दर्शनाने आपला देह पवित्र करतात. त्यामुळे अनेक भाविक भक्त पवित्र तो देह वाणी पुण्यवंत जो वेचितो सर्व काळ या संत वचनाप्रमाणे वारकरी पंढरीचे वारीचे महत्त्व जगाला पटुन देतात. त्यामुळे पंढरीची वारी आणि भाविक भक्त हे समीकरण जगाला धार्मिक ऐक्य दाखवून देते. यासाठी जीवन धन्य करण्यासाठी आयुष्यात मानवाने आपल्या जीवनामध्ये पंढरीच्या वारीचे महत्त्व जाणवून घेतले पाहिजे. आषाढ महिना आणि वारकरी एक पर्वकाळ आषाढ महिन्यातील एकादशीला आषाढी एकादशीची उपमा दिली आहे .याच एकादशीला देवशयनी एकादशी म्हणून ओळखले जाते. त्यामुळे ही एकादशी धार्मिक व आध्यात्मिक हेतू ने महत्त्वाची मानली जाते. या दिवशी देव निद्रिस्त होतात ही धार्मिक भावना आहे.त्यामुळे हा आषाढ महिना वारकरी आपला पर्वकाळ मानतात.

# वैजापुरात फेरी व पथनाट्यातून जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** अंमली पदार्थाचे वाढते व्यसन व तरुणाई भोवती पडत असलेला व्यसनांचा विळखा पाहता जागतिक अंमलीपदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधत सोमवार( ता,२६ )रोजी येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व पोलीस स्टेशन च्या वतीने कार्यालयापासून जन जागृती फेरी काढून व ठक्कर बाजार येथे पथनाट्य व गीताच्या माध्यमातून अंमली पदार्थ सेवनाने होणारे शारीरिक,मा नसिक,कौटुंबिक,शैक्षणिक दुष्परिणाम दाखविण्यात आले, तसेच अंमलीपदार्थ त्यागण्याचा संकल्प ही करण्यात आला,उपविभागीय पोलीस अधिकारी महक स्वामी ,पो.नि. संजय लोहकरे व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी या फेरीला ध्वज दाखवीला, जीवनाला हो म्हणा--अमली पदार्थाना नाही म्हणा निषेध करा-निषेध करा, अंमली पदार्थांचा निषेध करा अशा घोषणा देत ही फेरी ठक्कर बाजार येथे गेली व पथ नाट्य सादर केले. शिक्षक सना शेख व शिवप्रकाश देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली नंदकुमार कॉलेज ऑफ फार्मसी चे विद्यार्थी सर्वश्री वैभव पारखे,बिपीन जगताप, वैष्णवी पांडुरे, ईशा उदगीरकर, ऋषीकेश कवडे, कृष्णा राऊत, योगीराज कुमावत, भारती अहेवाड, साक्षी हडपे व भाग्यश्री यांनी सहभाग नोंदवून अंमली पदार्थ विरोधी जन जागृती केली.




# सोयगाव तालुक्यात पेरण्या खोळंबल्याने शेतकरीराजा हवालदिल

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा, देव्हारी,डाभा, जामठी, घाणेगांव तांडा, मोलखेडा, टिटवीसह परिसरातील शेतकऱ्यांनी पेरणीपूर्ण मशागतीची कामे पूर्ण केली असून पावसाअभावी पेरण्या खोळंबल्याने शेतकरीराजा हवालदिल झाला आहे. गेल्या वर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीला पावसाने चांगली साथ दिली होती. त्यावेळी उगवलेली कोवळी पीक जोमदार होती. परंतु मागील वर्षीच्या ऑगस्ट महिन्याचे दोन आठवडे आणि सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यात पावसाने दडी मारून ऐन पीकाला मालं लागण्याच्या हंगामात उघडीप दिल्याने उत्पन्नावर मोठा परिणाम झाला होता. त्यातून वाचलेली पीक नंतर अवकाळी वादळी पावसाच्या तडाख्यात सापडून सडली होती. यामुळे शेतकऱ्याने जीव लावून पीकवलेला शेतमाल कवडीमोल भावात काही माल विकावा लागला होता. तर अजूनही सावळदबारा परिसरात सोयाबीन व कापूस घरातच पडून आहे.त्यानंतर रब्बी हंगामात आठ पंधरा दिवस झाले की वातावरणात अचानक बदल वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी ठरलेली होती. वातावरणात अचानक बदलामुळे रब्बी हंगामातील गहू, हरभरा यासह विवीध पीकांवर परिणाम



होऊन उत्पन्नात मोठी घट बघायला मिळाली. त्यामुळे यावेळी पाऊस लांबल्याने महागाची खते, बियाणे वापरून पेरणी करण्यास कोणताही शेतकरी तयार नाही. यंदा काही ठराविक बागायतदार शेतकऱ्यांनी ठिबकवर उन्हाळी कपाशी व मिरचीची लागवड केली आहे. पेरणीला उशीर झाला तरी चालेल मात्र धूळपेरणी नको असा ठाम निर्णय सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी घेतल्याचे दिसत आहे. आता शेतीची कामे पूर्ण करुन शेतकऱ्यांच्या नजरा आता आभाळाकडे लागल्या आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# दीर्घायू जगायचं तर शेतात काम करा

## भोकरला मार्गदर्शन सोहळ्यात पंजाबराव डक यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** आपल्याकडे सरसरी पर्जन्यमान होत असते पण त्याचे योग्य नियोजन होत नसल्याने टंचाईचा सामना करावा लागतो नव्हे तर सिंचनाची सोय होत नाही. भुगर्भातील पाणी पातळी टिकून ठेवण्यासाठी जलसंधारणाची कामे घेतलीं पाहिजे. मानवास दीर्घायू व्हायचे असेल तर शेतात काम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रख्यात हवामान तज्ञ पंजाबराव डक यांनी शनिवारी ( ता २४ ) केलें आहे. शहरातील राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ व संदीप पाटील गोड मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेल्या शेतकरी मार्गदर्शन व सन्मान सोहळा घेण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शेतकरी शिवाजी पाटील किन्हाळकर होते. तर व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समिती भोकरचे सभापती जगदीश पाटील भोसीकर, माजी सभापती बाळासाहेब पाटील रावणगावकर, माजी सभापती गोविंद बाबा गौड, राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे मराठवाडा महासचिव तथा संपादक उत्तम बाबळे, ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड, सरपंच संघटना तालुका अध्यक्ष माधवराव अमृतवाड, याची उपस्थिती होती. प्रारंभी शेती औजारांचे पूजन करून व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.श्री. डक म्हणाले की, यावर्षी नांदेड जिल्ह्यात भरपूर पाऊस होईल तेव्हा शेतकऱ्यांनी न डगमगता जमिनीची ओली नऊ इंच भिजल्यानंतर पेरणी करावी. कापसाची लागण करताना लागवडीचे अंतर कमी करून बियाण्यांची संख्या वाढवावी. तसेच शेतात उताराच्या बाजूने चर काढावे जेणे करून जास्तीचा झालेला पाऊस निचरा होऊन उत्पन्न चांगले होईल निसर्गाच्या बदलाप्रमाणे शेतकरी ही बदलला पाहिजे तरच तो टिकाव धरणार आहे. प्रचंड झाडांच्या कतली झाल्यामुळे माळरान ओसाड झाला आहे त्यामुळे हवेतील तापमान प्रचंड वाढले असून आपला हक्काचा पाऊस इतरत्र जात आहे . शेतकऱ्यांनी आपल्या बांधावर व मोकळ्या जागेवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून त्यांची जोपासना करावी. शेतकऱ्यांनी निसर्गाकडे अत्यंत बारकाईने निरीक्षण करावे. जेणेकरून निसर्गाचे संकेत आपल्याला ओळखता येतील असा मौल्यवान संदेश दिला. कार्यक्रमात तालुक्यातील शेतीनिष्ठ शेतकऱ्यांना सन्मानपत्र,शाल,पूष्पगूच्छ देऊन गौरव करण्यात आला आहे.प्रास्ताविक पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी नार्लेवाड यांनी केले तर पत्रकार संघाचे सचिव आर. के. कदम यांनी पंजाब डक यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला. सूत्रसंचलन श्रीकांत मुक्कानवार व विपीन पवनकर यांनी केले. आभार संदीप पाटील गौड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष गंगाधर पडवळे, विजयकुमार चिंतावार, कमलाकर बरकमकर ,कोषाध्यक्ष बालाजी कदम, विठ्ठल सुरलेकर, गजानन गाडेकर, शुभम नर्तावार, सुधांशू कांबळे, संदेश कांबळे, संभाजी कदम, विशाल जाधव, अंबादास बोयावार, निळकंठ पडवळे, श्रीकांत बाबळे व संदीप पाटील गोड मित्र मंडळाने परिश्रम घेतले.यावेळी पंचक्रोशीतील बहूसंख्य नागरीकाची उपस्थिती होती.






# सुधीर गव्हाणे यांचा सपत्नीक सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सुधीर गव्हाणे यांना नुकताच छत्रपती संभाजीनगरमधील सर्वात मानाच्या समजल्या जाणाऱ्या संभाजी नगर भूषण पुरस्कारांनी रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद यांच्या वतीने अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.
त्यांच्या सन्मानाचे औचित्य साधून प्रसिद्ध कलावंत सुधीर कोर्टीकर यांनी सुधीर गव्हाणे सरांचा त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन सपत्नीक सत्कार केला.सुधीर कोर्टीकर आणि सुधीर गव्हाणे हे सोलापूरच्या दयानंद कॉलेजमध्ये शिकत असताना पासूनचे मित्र आहेत.

# मूग, उडिदाच्या लागवडीत घट होण्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** पश्चिम विदर्भात पाऊस लांबल्यास खरीप हंगामातील प्रमुख पिकांपैकी मूग आणि उडिदाच्या लागवडीत यंदा घट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पाऊस न झाल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत. शेतकरी मूग, उडिदाची पेरणी जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून ते जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करू शकतात. शेतकऱ्यांनी पेरणीला उशीर केल्यास त्यांना नुकसानही सहन करावे लागू शकते. अमरावती विभागात मुगाचे सरासरी लागवडीखालील क्षेत्र ६९ हजार ५६९ हेक्टर इतके आहे.

# चांगल्या पावसाची शेतकऱ्याला प्रतीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** गेल्या आठ ते दहा दिवसापासून कडंड ऊन तापत राहिल्याने शेतकऱ्याबरोबरच नागरिकांचा जीव कासावीस झाला होता. पेरणीचे दिवस सुरू झाले असताना पाऊस नाही. त्यामुळे शेतकरी राजा परेशान तर गर्मी ने नागरिक परेशान होत असताना अचानक काल अर्धा तास रिमझिम रिमझिम पावसाचे आगमन झाल्याने नागरिक मात्र चांगले सुखावले व चारठाणा थंडमय झाला. मात्र शेतकरी आजही चातक पक्षाप्रमाणे पावसाची तेही चांगल्या पावसाची वाट पाहत आहे काही शेतकरी बियाणे घेण्याच्या कामी लागले असून या सर्वांना पावसाची म्हणाले.दमदार पावसाची नितांत गरज असल्याचे मत सधन शेतकरी करीत आहेत .
बी बियाण बियाणे खरेदी करून आले, पण दमदार पाऊस न आल्यामुळे पेरणे होणार नसल्याचे ते शेतकरी सांगत आहेत.



# कुणबी समाजोन्नती संघाचे 'कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर'

आधुनिक केसरी न्यूज

**शहापूर (ठाणे) :** कुणबी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी कटिबध्द असलेले महाराष्ट्रातील संघटन म्हणजे कुणबी समाजोन्नती संघ मुंबई. या संस्थेच्या शहापूर शाखेच्या वतीने छत्रपती शाहु महाराज जयंतीनिमित्त 'कार्यकर्ता प्रशिक्षण' शिबिराचे आयोजन दि.२५/०६/२०२३ रोजी शहापूर तालुक्यातील 'प्रगती विद्यालय ठिळे' येथे करण्यात आले होते.
संस्थेच्या ध्येय व उद्दिष्टांनुरुप अपेक्षित समाजपरिवर्तन साधायचे असल्यास प्रथम 'शाखेचा कार्यकर्ता प्रशिक्षित असावा' या हेतूने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाची सुरुवात शाहू महाराज व महापुरुषांच्या प्रतिमापुजनाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.यावेळी सुश्राव्य जिजाऊवंदना महिला कार्यकर्त्यांनी सादर केली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. सुनिल देवरे सर यांनी प्रथम शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी कार्याची माहिती दिली.तदनंतर सकाळी ११ :०० ते ४:३० पर्यंत चाललेल्या या मुख्य मार्गदर्शन सत्रात त्यांनी कार्यकर्त्यांना सामाजिकतेचे भान जपत काम करण्याची गरज विशद केली. तसेच संघटनवाढीसाठी निष्ठेने व एकजुटीने कसे काम करावे या मुद्यांवर प्रभावीपणे मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणासाठी शहापूर मधील निवडक १०० कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदविला. संघटनवाढीसाठी वेळ, पैसा,बुध्दी, शक्ती आणि मनुष्यबळ यापैकी जे शक्य होईल ते देण्याची ग्वाही अनेक नवागत सदस्यांनी दिली.

या कार्यक्रमांमध्ये अनेक नवागत सदस्यांना पुस्तकपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच शिवविवाह सोहळ्यातुन समाजापुढे कृतीतुन पाऊल टाकणाऱ्या प्रतिक उमावणे व निखिल घोडविंदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला, तसेच आई- वडील आणि बळी पूजनाने आपला गृहप्रवेश करणाऱ्या मोहन पाटोळे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला, यावेळी शेंद्रुण विभागातील पदाधिकारी यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. मंडल आयोगाची घोषणा करणारे पंतप्रधान व्ही.पी.सिंह यांना जयंती बद्दल अभिवादन करण्यात आले तर शाखेच्या दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाचे संयोजन शेंद्रुण विभाग समितीतील संघटक व कार्यकर्ते यांकडुन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक श्री.सुनिल पाटील यांनी शाहू महाराजांच्या कार्याला उजाळा देत असे कार्यक्रम आमच्या विद्यालयात नेहमी आयोजित करावेत असे प्रतिपादन केले. मध्यांतरानंतर शिवश्री पुंडलिक महाराज पाटील यांनी सुंदर प्रबोधन गीत सादर केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रकाश पाटील सर यांनी केले तर प्रास्ताविक व आभारप्रदर्शन पुरूषोत्तम ठाकरे सर यांनी केले. यावेळी शहापूरसह ठाणे व मुंबई जिल्ह्यातील अनेक वैचारिक समाजबांधवांनी सहभाग नोंदविला.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या
स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
✲ मासिक पाळी अनियमित असणे
✲ हॉर्मोन्स चे असंतुलन
✲ मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
✲ PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
✲ मासिक पाळी बंद होणे
✲ वारंवार गर्भपात होणे
✲ श्वेत प्रदर (पांढरे जाणे)
पुरूषांना होणाऱ्या समस्या
✲ शुक्राणु कमी असणे
✲ शुक्राणुची गती कमी असणे
✲ शुक्राणु स्खलन
✲ स्वप्न दोष
✲ सेक्स इच्छा कमी होणे इ.
फीस - 300 रू.
संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध
पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.